रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २७२ । पृष्ठे ८ ▌RGD/016/2026-28

www.krushival.in

# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १२ मार्च २०२६

किंमत ४ ₹

## स्मशानातील राखेत सोन्याचा शोध?

**पनवेल/ दीपक घरत**

पालिका हद्दीतील काही स्मशानभूमींमधून राख चोरीला जात असल्याच्या तसेच स्मशान परिसरात अघोरी प्रकार होत असल्याच्या बातम्या 'कृषीवल'मध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर परिसरात चर्चांना उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर या प्रकरणात एक वेगळी माहिती समोर आली आहे. या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रकरणाची पालिकेकडून सखोल चौकशी करण्याची मागणी केली जात आहे. **सविस्तर वृत्त पान ३ वर**

## यंदा मान्सूनवर 'अल नीनो'चे सावट

**मुंबई :** यंदाच्या मान्सूनबाबत पहिला अंदाज समोर आला असून, देशासह महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. जागतिक हवामान संघटनेच्या अंदाजानुसार यावर्षी मान्सूनवर 'अल नीनो'चा प्रभाव राहू शकतो, त्यामुळे पावसाचे प्रमाण घटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भारतामधील बहुतांश शेती पावसावर अवलंबून असल्याने या अंदाजामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. तसेच यावर्षी उन्हाचा कडाकाही अधिक जाणवू शकतो आणि तापमानात वाढ होण्याचा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.



अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१२ मार्च

१) श्री.पांडुरंग अच्युत कांबळी
घरतआळी, अलिबाग
१२-३-१९३५

२) श्री. विजयकुमार चेत्रय्या स्वामी
गोंधळपाडा, अलिबाग
१२-०३-१९४६

३) श्री. अनंत भिवा पडवळ
वरसोली-अलिबाग
१२-०३-१९४०

# विद्यार्थ्यांच्या खिशावर डल्ला का?

## स्पर्धा परीक्षा शुल्कावर डॉ. नितीन राऊत आक्रमक; खासगी कंपन्यांवर 'कॅपिंग' लावण्याची मागणी

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

स्पर्धा परीक्षांच्या वाढत्या शुल्कामुळे राज्यातील विद्यार्थ्यांवर मोठा आर्थिक ताण येत असल्याचा मुद्दा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री आमदार डॉ. नितीन राऊत यांनी विधानसभेत उपस्थित केला. परीक्षांच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या खिशावर डल्ला टाकला जात आहे का, असा सवाल उपस्थित करत त्यांनी सरकारला धारेवर धरले.



विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून बोलताना डॉ. राऊत म्हणाले की, एका उमेदवाराला वर्षभरात पाच ते सहा स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. प्रत्येक परीक्षेसाठी सुमारे एक हजार रुपये शुल्क आकारले जात असल्याने केवळ अर्ज भरण्यासाठीच एका विद्यार्थ्याच्या कुटुंबाला सहा ते सात हजार रुपयांचा खर्च करावा लागतो. ग्रामीण भागातील शेतकरी व कष्टकरी कुटुंबांसाठी हा खर्च परवडणारा नसल्याचे त्यांनी नमूद केले.

डॉ. नितीन राऊत यांनी यावेळी सरकारच्या धोरणांवर सडकून टीका केली. ते म्हणाले की, राज्याच्या तिजोरीतून हजारो कोटी रुपये जाहिराती आणि इव्हेंट्सवर खर्च करणाऱ्या सरकारला गोरगरीब विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी लागणारा खर्च उचलणे जड जात आहे का? सीसीटीव्ही, बायोमॅट्रिक आणि जॅमर या सुरक्षा सुविधांची जबाबदारी प्रशासनाची आहे, मग त्याचे ओझे आर्थिक विवंचनेत असलेल्या विद्यार्थ्यांवर का टाकला जात आहे?

### समिती स्थापन करणार - आशिष शेलार

या प्रश्नावर उत्तर देताना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आशिष शेलार यांनी सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले. एमपीएससीच्या कक्षेबाहेरील काही परीक्षा यापूर्वी खासगी कंपन्यांमार्फत घेतल्या जात होत्या; त्या आता एमपीएससीमार्फत घेण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात किती सवलत देता येईल, याचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत करण्यात येणार असून ५० टक्क्यांहून अधिक सवलतीबाबतही सरकार सकारात्मक विचार करेल, असेही त्यांनी सांगितले.

### मागासवर्गीय उमेदवाराला सवलत द्या

डॉ. राऊत यांनी यावेळी मागासवर्गीय उमेदवारांना मोठी सवलत देण्याची मागणी केली. खुल्या प्रवर्गासाठी हजार रुपये शुल्क असताना मागासवर्गीय विद्यार्थ्यांना केवळ १० टक्के सवलत देणे, ही अन्यायकारक बाब असल्याचे त्यांनी सांगितले. हरियाणा तसेच इतर राज्यांप्रमाणे महिला व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क नाममात्र किंवा मोफत करण्याचा विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली.

### भरती प्रक्रिया की नफेखोरीचे केंद्र?

स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी काही ठिकाणी खासगी कंपन्यांची नियुक्ती केली जाते. एका परीक्षेला पाच ते दहा लाख विद्यार्थी बसतात आणि त्यामुळे शेकडो कोटी रुपयांची रक्कम जमा होते. ही भरती प्रक्रिया आहे की नफेखोरीचे केंद्र?, असा सवाल उपस्थित करत त्यांनी खासगी कंपन्यांच्या शुल्कावर सरकारने 'कॅपिंग' (मर्यादा) लावावी, अशी मागणी देखील यावेळी डॉ. राऊत यांनी केली.

## निवडक

### विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान



**पनवेल ग्रामीण** : वाशी येथील न्यूईरा हॉस्पिटलमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आरोग्यसेवा, पोलीस, शिक्षण, प्रसारमाध्यम आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला मुंबई उच्च न्यायालयाच्या वकील जयश्री अकोलकर या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर महिलांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमात महिलांच्या सक्षमीकरणावर प्रेरणादायी विचार मांडण्यात आले. यावेळी केक कटिंग, सांस्कृतिक सादरीकरण तसेच उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, महिलांच्या आरोग्याची काळजी लक्षात घेऊन हॉस्पिटलतर्फे विशेष 'महिला आरोग्य तपासणी पॅकेज' जाहीर करण्यात आले. तसेच, महिलांनी नियमित आरोग्य तपासणी करून स्वतःच्या आरोग्याला प्राधान्य द्यावे, असे आवाहन हॉस्पिटल प्रशासनाने केले.

### महिला पालक मेळावा उत्साहात



**माणगाव** : छत्रपती शिक्षण मंडळ, कल्याण संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड येथे सखी सावित्री समिती व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त सोमवारी (दि.९) महिला पालक मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. 'सुजाण पालकत्व' असा या मेळाव्याचा विषय होता. कार्यक्रमाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून अनिता सुनील मोरे (एम.ए. मराठी, समुपदेशक) यांनी उपस्थित माता-भगिनींना मार्गदर्शन केले. त्यांनी बदलत्या काळात मुलांच्या संगोपनात आई-वडिलांची भूमिका, मुलांशी भावनिक संवाद कसा ठेवावा, तसेच कुटुंबातील नातेसंबंध दृढ ठेवण्याचे महत्त्व याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आजच्या स्पर्धात्मक युगात मुलांच्या मानसिक विकासासाठी पालकांनी सकारात्मक वातावरण निर्माण करणे, मुलांना योग्य दिशा देणे आणि त्यांच्याशी मैत्रीपूर्ण नाते ठेवणे आवश्यक असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून सांगितले. या मेळाव्याला विद्यालयातील महिला पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमामुळे पालकांमध्ये जागरूकता निर्माण झाली असून उपस्थितांनी या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कै. भावना भालचंद्र म्हात्रे, स्मरणार्थ, सातिर्जे, अलिबाग**

## 'अजित कडकडे संगीत रजनी' कार्यक्रम

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बोरीवली येथील प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृहात बुधवार दि.१८ मार्च रोजी, रात्री ८.३० वाजता प्रख्यात ज्येष्ठ गायक अजित कडकडे यांच्या विशेष 'अजित कडकडे संगीत रजनी' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दर्शन क्रिएशन्स आणि शु-हर्ष इंटरप्राइझेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात भक्तिगीत, नाट्यसंगीत आणि भावगीतांचा सुरेल संगम रसिकांना अनुभवता येणार आहे. या संगीत रजनीमध्ये प्रख्यात गायक अजित कडकडे आपल्या अनेक लोकप्रिय आणि कालातीत रचना सादर करणार आहेत.

# महिला दिनानिमित्त 'जल्लोष नारीशक्तीचा'

## कर्तुत्ववान महिलांसह लोककलावंतांचा सन्मान

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट महाडतर्फे शनिवारी (दि.७) 'जल्लोष नारीशक्तीचा' या महिलांच्या सन्मानार्थ दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. श्री विरेश्वर महाराज मंदिर सभागृह महाड येथे हा सोहळा पार पडला. रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट प्रेसिडेंट जॉन्सन डिसोझा यांच्या संकल्पनेतून नारी शक्तीचा सन्मान व आई मुलीच्या सुंदर नात्याचा उत्सव साजरा करण्यासाठी या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून झी मराठीवरील स्वराज्य रक्षक संभाजी या सुप्रसिद्ध मालिकेतील राणू आक्कांची भूमिका साकारणारी प्रसिद्ध मराठी अभिनेत्री अश्विनी प्रदीप कुमार महांगडे यांच्या समवेत मिसेस इंडिया विनर भारती पाटील याची विशेष उपस्थिती होती. तर प्रमुख उपस्थिती रोटेरियन विवेक दीक्षित, मेंबरशिप डायरेक्टर ऑफ रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ व रोटेरियन कैलास मोंगा डिस्ट्रिक्ट डायरेक्टर ऑफ रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३१ यांच्यासह अनेक डिस्ट्रिक्ट मेंबर्स हे ही उपस्थित होते.

या महिला सन्मान सोहळ्यात रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट कडून 'रोटरी नारीशक्ती सन्मान २०२६' ने महाड शहर सहाय्यक पोलीस निरीक्षक विद्या राऊत, गटविकास अधिकारी पंचायत समिती पोलादपूर दीप्ती गाट, डॉ. सना शेख, शेख क्लिनिक महाड या महाड पोलादपूरमधील कर्तुत्ववान प्रेरणादायी महिलांना विशेष सन्मानित करण्यात आले.

महिला शक्तीचा जागर करण्याकरिता 'परफेक्ट मॅचिंग विथ रॅम्प वॉक' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी खालुबाजा वादक लोककलावंत दीपक सोनवणे, सोनू जाधव व गोवर्धन सकपाळ यांनाही सन्मानित करण्यात आले.

## लिला मरवडे यांचे निधन



**खांब :** रोहा तालुक्यातील श्री क्षेत्र तळवली तर्फे अष्टमी या गावच्या रहिवासी लिला रावजी मरवडे यांचे गुरुवारी (दि.५) वयाच्या सुमारे ६५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. लिला मरवडे यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, सुन, जावई, नातवंडे, भाऊ, बहिणी, पुतणे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी शनिवार दि.१४ मार्च रोजी, तर अंतिम धार्मिकविधी मंगळवार दि.१७ मार्च रोजी होणार आहेत, अशी माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

## पोलीस ठाण्यात 'बॉटल बिन'ची स्थापना

**पनवेल :** प्लास्टिक प्रदूषणाला आळा घालण्यासाठी 'गो ग्रीन' संस्थेच्या पुढाकारातून पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 'बॉटल बिन'ची स्थापना करण्यात आली आहे. गो ग्रीन संस्थेचे संस्थापक भरत सोनी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला आहे. या बिनच्या माध्यमातून प्लास्टिक कचरा व बाटल्या एकत्र करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यास मदत होणार असून प्लास्टिक प्रदूषण रोखण्याचा यामागचा मुख्य उद्देश आहे. भारतामध्ये वाढत चाललेल्या प्लास्टिक प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर 'गो ग्रीन' संस्थेने पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण पुढाकार घेत 'बॉटल बिन' हा अभिनव कचरा व्यवस्थापन बिन सादर केला आहे. हा बिन विशेषतः प्लास्टिक कचरा गोळा करणे, त्याचे विलगीकरण करणे आणि पुनर्वापरासाठी पाठवणे यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. 'बॉटल बिन' सार्वजनिक उद्याने, सरकारी आणि शैक्षणिक संस्था, सहकारी संस्था, आरोग्य केंद्रे, समुद्रकिनारे, पर्यटनस्थळे, पेट्रोल पंप, ग्रामपंचायती तसेच रेल्वे आणि बस स्थानकांसारख्या ठिकाणी बसविण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. यामुळे परिसर स्वच्छ राहण्यास मदत होणार आहे.

# १३५ नागरिकांना विविध दाखल्याचे वाटप




**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत येथे रविवारी (दि.८) छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर आयोजित करण्यात आले होते. पहिल्या टप्प्यात शासनाच्या विविध योजना, दाखले, शासन निर्णय यांची माहिती देण्यात आली. तसेच नावीन्यपूर्ण योजनेतून आपत्ती व्यवस्थापन प्रथमोपचार मार्गदर्शन व प्रात्यक्षिक जिल्हा समन्वयकांकडून देण्यात आले.

शासनाच्या निर्देशानुसार महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान अंतर्गत पहिल्या टप्प्यातील योजना अंमलात आणण्याची घोषणा करण्यात आली आहे.

या योजने अंतर्गत रविवारी (दि.८) उरण येथील चाणजे महसूल विभागात शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात उरण तालुक्यातील नागरिकांना महसूल व इतर विविध शासकीय विभागामार्फत सेवा प्रदान करण्यात आल्या. यामध्ये ६८ लाभार्थ्यांना उत्पन्नाचे, जातीचे, वय, अधिवास, नॉनक्रिमिलेयर दाखल्याचे वाटप करण्यात आले. ५३ व्यक्तींना डिजिटल सातबारा आठ जणांना ८ अ जमिनीच्या दाखल्याचे वाटप करण्यात आले. दोघांना नविन शिधावाटप पत्रिका तर ४ नागरिकांना दुय्यम शिधापत्रिकांचे वाटप करण्यात आले. तसेच यावेळी जमिनीच्या फेरफारची सात प्रकरणे निकाली काढण्यात आली. १२ शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेची माहिती देण्यात आली. संजय गांधी योजना अंतर्गत २० पात्र अर्जदारांना लाभ मंजूरीचे आदेश देण्यात आले आहेत. अभिलेख कार्यालयाकडून चार शेतकऱ्यांना जमिनीच्या फेरफाराबाबत माहिती देण्यात आली.

तसेच, या शिबिरात नागरी संरक्षण दलाच्या मनोहर म्हात्रे यांनी उपस्थित नागरिकांना सर्पदंश व आपात्कालीन परिस्थितीत रुग्णांवर प्राथमिक उपचार कसे करावेत, याबाबत माहिती दिली. तसेच २५ रुग्णांची आरोग्य तपासणी करून त्यांना औषधे देण्यात आली.

# प्रमोद म्हसकर यांचा पुरस्काराने सन्मान

**। कोलाड । प्रतिनिधी ।**

रोहा तालुक्यातील पुगांव गावचे सामाजिक कार्यकर्ते प्रमोद म्हसकर यांना द्रोणाचार्य संस्थेच्या वार्षिक सोहळ्यात 'द ओमेगा लिगसी पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.



म्हसकर यांनी आपल्या कर्तृत्वाने मुंबई ते दुबईपर्यंत व्यवसायाचा विस्तार केला असून त्यांनी सामाजिक कार्यात ही अतिशय मोलाची कामगिरी करीत आहेत. यामुळे त्यांना या दातृत्वाने रायगडच्या कानाकोपऱ्यात माणसातला देवमाणूस म्हणून ओळखले जात आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना ठाण्यातील नामांकित द्रोणाचार्य शिक्षण प्रसारक संस्थेच्या वतीने ओमेगा, उत्कृष्ट क्रीडा, आरोग्य आणि समाज कल्याण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. कल्याण येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात पार पडलेल्या या सोहळ्यात प्रमोद म्हसकर यांचा नागरी सत्कार सुद्धा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. प्रमोद म्हसकर यांना हा पुरस्कार मिळाल्याने संपूर्ण रायगड जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

प्रमोद शेठ म्हसकर यांनी गोरगरीबंना चटई, ब्लँकेट असे घरुपयोगी वस्तूंचे आतापर्यंत २०००० कुटुंबांना वाटप करण्यात आले आहे. अनेक जखमी खेळाडूंच्या शस्त्रक्रियेचा खर्च उचलून त्यांनी आपली क्रीडा क्षेत्राबद्दलची आत्मीयता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. आरोग्य क्षेत्रातही दरवर्षी लाखो रुपयांचा निधी खर्च करून हजारो गरिबांच्या आयुष्यात त्यांनी आशेचा किरण निर्माण केला आहे.

## 'सावित्रीबाई फुले यांचे कार्य जोपासा'

**आगरदांडा :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी पहिली पुण्यात मुलींसाठी शाळा काढली. भारताच्या प्रथम महिला शिक्षिका ही एवढीच ओळख सावित्रीबाई फुलेंच्या कर्तृत्वाची करून देण्यासाठी पुरेशी नाही, तर उत्तम कवयित्री, समाजसेविका असून त्यांनी देशासाठी केलेले कार्य प्रत्येकांनी जोपासले पाहिजे. तरच सावित्रीबाईना खरी आदरांजली होईल, असे प्रतिपादन शिक्षिका तनुजा गोबरे यांनी केले. त्या वीर कोंडाजी फर्जंद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सावित्रीबाई फुले पुण्यतिथी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमावेळी बोलत होत्या.

# ग्रुप ग्रामपंचायत जासईतर्फे महिलांना आर्थिक सहाय्य



**उरण :** जासई येथे महिला दिन साजरा करून विधवा, परितक्त्या, घटस्फोटित महिलांना आर्थिक सहाय्य, ५ हजार रुपयांचा धनादेश व कचराकुंडीचे वाटप करण्यात आले. नवनिर्वाचित रायगड जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील तसेच पंचायत समिती सदस्या निर्मला घरत यांचा सत्कार ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आला. यावेळी सरपंच संतोष घरत, उपसरपंच सृष्टी अमर म्हात्रे, सर्व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी पालकर, ग्रामपंचायत सदस्य आदित्य घरत, धिरज घरत, सुदर्शन पाटील, सुलोचना घरत, अश्विनी नाईक, जयश्री घरत, हर्षदा तांडेल, प्रतीक्षा म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

## राबगाव येथे महिला दिन साजरा



**पाली :** ग्रामपंचायत राबगाव यांच्या नियोजनातून मुख्यमंत्री ग्राम समृद्ध योजना अभियानांतर्गत महिलांसाठी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ग्रामपंचायत कार्यालयात महिलांसाठी विविध उपक्रम आयोजित केले होते. यात आरोग्य शिबीर, हळदी कुंकू, सॅनिटरी पॅडच्या मशीनचे अनावरण असे अनेक उपक्रम मंगळवारी (दि.१०) राबविण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राजमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर ग्रामपंचायत अधिकारी योगेश गायकवाड यांनी उपस्थित महिलांचे स्वागत करून प्रास्ताविक सांगितले. त्यानंतर उपस्थित मार्गदर्शक डॉ. झोलगे आणि डॉ. प्रणाली भोईर तसेच पूजा हंबीर यांनी महिलांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामसंघ पदाधिकारी व गावातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## गरिबांसाठी मोफत उपचार सुरू

**महाड :** महाड तालुक्यातील ग्रामीण भागातील गरजू व गरीब रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत योजना अंतर्गत उपचार मोफत मिळण्याचे सुविधा आता आदित्य नर्सिंग होम येथे सुरू करण्यात आली आहे. प्राथमिक स्वरूपात या ठिकाणी हृदयविकार संबंधित एन्जोप्लास्टी ही आयुष्यमान भारत योजने अंतर्गत मोफत केली जाणार असल्याचे डॉ. आदित्य महामुणकर यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र शासनाच्या आयुष्यमान भारत योजना ही पाच लाखापर्यंत मोफत योजना असून महात्मा फुले जन आरोग्य योजना हे देखील विविध शासकीय रुग्णालयामध्ये कार्यरत आहे. मात्र खाजगी रुग्णालयात देखील चांगल्या प्रकारचे उपचार रुग्णांना मिळावेत, या उद्देशाने शासनाने खाजगी रुग्णालयामध्ये देखील या योजना लागू करण्यात येते सक्तीचे केले आहे. परंतु, सर्वच रुग्णालयांमध्ये या सुविधा सुरू झालेल्या नव्हत्या. मात्र महाडसारख्या छोट्या शहरांमध्ये डॉ. आदित्य महामुणकर यांनी पुढाकार घेत आदित्य नर्सिंग होम या हृदयरोग चिकित्सालयात आयुष्यमान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजनेचे लाभ रुग्णांना देण्यास सुरुवात केली आहे. शासनाच्या या योजनेचा लाभ गरीब व गरजू रुग्णांनी घ्यावा, असे आवाहन डॉक्टरांनी यावेळी केले. मात्र, यासाठी प्रत्येक नागरिकांनी आपले आयुष्यमान भारत नोंद करून घेणे गरजेचे आहे, जेणेकरून आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना तात्काळ उपचार सुरू करता येऊ शकतो.

## साठवण/थांबा कालावधी शुल्क पूर्णपणे माफ | जहाज उपलब्ध होईपर्यंत साठवणूक सुविधा

# फळे, भाजीपाला निर्यातदारांना मोठा दिलासा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील फळे आणि भाजीपाला उत्पादक शेतकरी तसेच निर्यातदारांचे जहाजांअभावी कंटेनर अडकले आहेत. सध्या सुमारे २५० कंटेनर जवाहरलाल नेहरू बंदर (जेएनपीटी) येथे अडकून पडले आहेत, तर आणखी सुमारे १५० कंटेनर गुजरात येथील मुंद्रा बंदरावर थांबलेले आहेत. त्यामुळे हा भाजीपाला आणि फळे खराब होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहेत. त्यामुळे आता या निर्यातदारांना आणि शेतकऱ्यांना सरकारने दिलासा देणारा निर्णय घेतला आहे.

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने (जेएनपीए) अडकलेल्या फळे आणि भाजीपाला निर्यात कंटेनरवरील साठवण तसेच थांबा कालावधी शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच शीतगृह कंटेनर विद्युत जोडणी शुल्कात ८० टक्के सवलत देण्याचा तसेच नवीन जहाज उपलब्ध होईपर्यंत साठवणूक सुविधा उपलब्ध करून देण्याचाही महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे, अशी माहिती राज्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिली आहे.



मध्यपूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीत निर्माण झालेल्या भूराजकीय तणावामुळे भारतातून जीसीसी देशांकडे होणाऱ्या फळे व भाजीपाला निर्यातीसमोर गंभीर संकट निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर पणन मंत्री जयकुमार रावल यांनी जेएनपी आणि मुद्रा बंदरात अडकलेल्या फळे व भाजीपाला कंटेनरांवर तातडीने शुल्क माफी मिळावी व जहाज उपलब्ध होईपर्यंत साठवणूक सुविधा उपलब्ध करून द्यावी, यासाठी केंद्रीय बंदरे, जहाजरानी व जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल तसेच केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पियूष गोयल यांना तातडीच्या उपाययोजना करण्याची विनंती केली होती.

याबाबत केंद्र सरकारकडून सकारात्मक दखल घेतली. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाने (जेएनपीए) निर्यात कंटेनरवरील साठवण/थांबा कालावधी शुल्क पूर्णपणे माफ करण्याचा तसेच शीतगृह कंटेनर विद्युत जोडणी शुल्कात ८० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. ही सवलत २८ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते १४ मार्च २०२६ रोजी मध्यरात्रीपर्यंत १५ दिवसांसाठी लागू राहणार आहे. ही सवलत २८ फेब्रुवारी रोजी टर्मिनलमध्ये असलेल्या तसेच ८ मार्च रोजी सकाळी ७ वाजेपर्यंत प्रवेश नोंद झालेल्या कंटेनरना लागू असेल.

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २७२ । पृष्ठे ८ । RGD/016/2026-28 www.krushival.in


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. १२ मार्च २०२६

किंमत ४ ₹


## सोन्या-चांदीच्या दरात वाढ

**नवी दिल्ली :** दिवसेंदिवस सोन्या-चांदीच्या दरात वाढ होत असल्याचे चित्र दिसत आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील मजबुती आणि अमेरिकन डॉलर कमकुवत झाल्याने मंगळवारी फ्युचर्स ट्रेडिंगमध्ये चांदीच्या किमतीत मोठी वाढ झाली. चांदीचा दर तब्बल १०,४४२ रुपयांनी वाढून सुमारे २ लाख ७७ हजार रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचला. दरम्यान, सोन्याच्या किमतीतही वाढ झाली असून, ते १ लाख ६२ हजार रुपयांवर गेले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील हालचाली आणि डॉलरच्या घसरणीमुळे मौल्यवान धातूंना तेजी मिळाल्याचे बाजार विश्लेषकांनी सांगितले आहे.

## रोहित पवारांनी घेतली गडकरींची भेट

**नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेऊन विविध मुद्द्यांवर चर्चा केली. यावेळी दिवंगत नेते अजित पवार यांच्या नावाने दोन महामार्ग प्रकल्पांना नाव देण्याची मागणी त्यांनी केली. तसेच बारामतीतील विमान अपघात प्रकरणाच्या पारदर्शक चौकशीबाबतही गडकरी यांच्याशी चर्चा करण्यात आली. या अपघाताची सखोल चौकशी व्हावी यासाठी संसदेत मुद्दा उपस्थित करण्यासाठी विविध पक्षांच्या नेत्यांची भेट घेत असल्याचे रोहित पवार यांनी सांगितले.

# हरीशला मिळणार इच्छामरण







**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

**सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी एका दशकाहून अधिक काळ दीर्घकालीन सुप्तावस्थेमध्ये असलेल्या ३२ वर्षीय पुरुषाला इच्छामृत्यूसाठी मंजुरी दिली आहे. न्यायमूर्ती जेबी पारडीवाला आणि केव्ही विश्वनाथन यांच्या खंडपीठाने म्हटले की, २०१८ च्या कॉमन कॉज निर्णयाची ही पहिलीच न्यायालयीन अंमलबजावणी आहे, ज्यात सन्मानाने मरण्याचा अधिकार मान्य करण्यात आला आहे.**

- **सर्वोच्च न्यायालयाकडून देशात पहिल्यांदाच इच्छामृत्यूला परवानगी**
- **१३ वर्षांपासून अंथरुणाला खिळून असलेले हरीश राणांना सन्मानपूर्वक अधिकार**

१५ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयाने ३२ वर्षीय हरीश राणा यांच्या कुटुंबाने दाखल केलेल्या याचिकेवर आपला निर्णय राखून ठेवला, ज्यामध्ये त्यांनी जवळजवळ १३ वर्षे दीर्घकालीन सुप्तावस्थामध्ये राहिल्यानंतर कृत्रिम जीवरक्षक प्रणाली काढून टाकण्याची मागणी केली होती. दीर्घकालीन सुप्तावस्थेमधील व्यक्ती जागृत असल्याचे दिसते, परंतु ती कोमासारखीच अवस्था असते, जिथे जाणीव नसते.

सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी आणि राणांच्या कुटुंबाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या रश्मी नंदकुमार यांचे युक्तिवाद ऐकले. १३ जानेवारीला सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांनी राणाच्या पालकांची आणि त्याच्या धाकट्या भावाची वैयक्तिक भेट घेतली. कुटुंबाने न्यायाधीशांना सांगितले की, राणाला आणखी त्रास होऊ नये, अशी त्यांची इच्छा आहे.

२०१३ मध्ये पंजाब विद्यापीठातील विद्यार्थी हरीश त्याच्या पदव्युत्तर शाळेच्या चौथ्या मजल्यावरून पडला आणि त्याच्या डोक्याला दुखापत झाली. तेव्हापासून तो पूर्णपणे अंथरुणाला खिळून आहे आणि कृत्रिम जीवरक्षक प्रणालीवर आहे. इतक्या वर्षांत त्याच्या पालकांनी हरीशसाठी इच्छामरणाची मागणी करण्याची ही दुसरी वेळ आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या अहवालाची दखल घेतली, ज्यामध्ये असे म्हटले होते की, उत्तर प्रदेश सरकारच्या मदतीने आणि डॉक्टर आणि फिजिओथेरपिस्टच्या नियमित भेटींसह हरीशला घरीच ठेवण्यात येणार आहे.

पान ५ वर

## वे|ध|क

### तरुणाचा आत्मदहनाचा प्रयत्न


**मुंबई :** विधान भवनात बुधवारी अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ सुरू असतानाच बाहेर एका तरुणाने आत्मदहनाचा प्रयत्न केला. पोलिसांनी तात्काळ धाव घेत तरुणाला ताब्यात घेतल्याने पुढील अनर्थ टळला. दादासो बबन कालसैत असे ताब्यात घेतलेल्या ३८ वर्षीय तरुणाचे नाव आहे. माढा तालुक्यातील टाकळी येथील रहिवासी असलेल्या दादासोने उषा मेहता चौकात आत्मदहनाचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी त्याला वेळीच रोखले. त्याला मरीन ड्राइव्ह पोलीस ठाण्यात नेण्यात आले आहे.

### शिवसेना कोणाची?; आज सुनावणी

**मुंबई :** शिवसेना पक्ष आणि 'धनुष्यबाण' या निवडणूक चिन्हाच्या वादावर उद्या गुरुवार, दि. १२ मार्च रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. या प्रकरणाची सुनावणी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर होणार असल्याची माहिती समोर आली आहे. या सुनावणीकडे राज्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# 45,000 कंटेनर्सची कोंडी

- **मध्यपूर्वेतील युद्धाचा भारतीय मालाला फटका**
- **निर्यातदारांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान**



**। उरण । प्रतिनिधी ।**

मध्य पूर्वेतील युद्धामुळे जागतिक व्यापार मार्गांवर मोठा परिणाम झाला असून, भारतीय निर्यातदारांची मोठी आर्थिक कोंडी झाली आहे. सध्या सुमारे ४० ते ४५ हजार भारतीय कंटेनर्स अडकून पडले असल्याची माहिती समोर आली आहे. काही कंटेनर्स समुद्रप्रवासातच थांबले आहेत, तर काही विविध आंतरराष्ट्रीय बंदरांमध्ये अडकलेले आहेत. या कंटेनर्समध्ये असलेल्या एक ते दीड अब्ज डॉलर्स किमतीच्या मालाचे भवितव्य सध्या अधांतरी झाले आहे. त्यामुळे भारतीय निर्यातदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

केंद्रीय जहाज मंत्रालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतीय माल घेऊन परदेशात जाण्याआधीच भारतातील विविध बंदरांमध्ये सुमारे २० हजार जहाजे रखडली आहेत. या जहाजांवरील कंटेनर्सना कधी मार्ग मोकळा होणार याची प्रतीक्षा लागली आहे.

दरम्यान, या अडकलेल्या कंटेनर्ससमोर सध्या दोनच पर्याय उरले आहेत. एक म्हणजे, युद्धग्रस्त मार्ग टाळण्यासाठी मोठा आणि खर्चिक वळसा घेऊन निश्चित ठिकाणी पोहोचणे, किंवा सरळ युटर्न घेऊन पुन्हा भारतात परतणे. दोन्ही पर्याय निर्यातदारांसाठी मोठ्या आर्थिक फटक्याचे ठरत आहेत. यात भर म्हणजे, शिपिंग कंपन्यांनी या परिस्थितीचा फायदा घेत विविध आपत्कालीन अधिभार आकारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे एका कंटेनरच्या निर्यातीसाठी येणाऱ्या खर्चात तीन ते पाच पट वाढ झाल्याची माहिती आयात-निर्यात क्षेत्रातील जाणकारांनी दिली आहे.

ट्रायटॉन लॉजिस्टिक्स अँड मेरिटाईनचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र श्रीवास्तव यांनी सांगितले की, भारतीय माल घेऊन परदेशात निघालेल्या ४०-४५ हजार कंटेनर्सपैकी सुमारे ८० टक्के कंटेनर्स अजूनही समुद्रप्रवासातच अडकलेले आहेत. काही कंटेनर्स हवाई मार्गानेही पान ५ वर

### अडकलेल्या कंटेनरप्रकरणी नाना पाटोले यांची पाहणी

**उरण :** काँग्रेस नेते, आमदार नाना पटोले यांनी जेएनपीए बंदराला भेट देत आयात-निर्यातीवर झालेल्या परिणामाचा आढावा घेतला. आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे मागील अनेक दिवसांपासून हजारो कंटेनर बंदरात अडकून पडले असल्याची माहिती समोर आली. याबाबतचा आढावा घेत शेतकऱ्यांच्या आणि व्यापाऱ्यांच्या झालेल्या नुकसानाबाबत केंद्र सरकार आणि राज्यसरकारवर पटोले यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तर, संपूर्ण प्रकाराबाबत सभागृहात मुद्दे मांडणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. जवाहरलाल नेहरू प्राधिकरण (जेएनपीए) प्रशासन आणि सीमाशुल्क विभागामार्फत अडकलेले कंटेनर निर्यातदारांना परत देण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती बंदर प्रशासनाने दिली. या पार्श्वभूमीवर नाना पाटोले यांनी बंदरातील परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करत अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली. जेएनपीए प्रशासन पान ५ वर

# रायगडात पर्यटन, हॉटेल संकटात

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीचे पडसाद आता रायगड जिल्ह्यात उमटू लागले असून, गॅस तुटवड्यामुळे पर्यटनावर अवलंबून असलेला हॉटेल व कॉटेज व्यवसाय अडचणीत आला आहे. कमर्शिअल गॅस सिलिंडरचा पुरवठा बंद झाल्याची माहिती समोर येत असल्याने व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. वेळेत गॅस उपलब्ध न झाल्यास अनेक हॉटेल्स बंद ठेवण्याची वेळ येऊ शकते, अशी भीती व्यक्त होत असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी पर्यटन व्यवसायिकांकडून केली जात आहे.

रायगड हा पर्यटनावर आधारित जिल्हा म्हणून ओळखला जातो. अलिबागसह जिल्ह्यातील विविध ठिकाणी मिळणाऱ्या घरगुती जेवणांचा आस्वाद घेण्यासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत असतात. मात्र, सध्या आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे गॅसचा तुटवडा निर्माण झाला आहे. जिल्ह्यात कमर्शिअल गॅस सिलिंडरचा पुरवठा बंद झाल्याची माहिती पुढे येत आहे. त्यामुळे पर्यटनावर आधारित असलेला हॉटेल आणि कॉटेज व्यवसाय मोठ्या संकटात सापडला आहे. गॅस सिलिंडर उपलब्ध न झाल्यास हॉटेल बंद ठेवण्याची वेळ व्यावसायिकांवर येण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम या व्यवसायावर अवलंबून असलेल्या अनेक नागरिकांच्या रोजगारावरही होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने तातडीने लक्ष घालून पर्यटन व्यवसाय टिकून राहण्यासाठी आवश्यक ती पावले पान ५ वर

#### व्यावसायिक सिलिंडर बंद; चिंतेचे वातावरण

रायगड जिल्ह्यातही गॅसचा तुटवडा जाणवू लागला असून, पूर्वी पंधरा दिवसांनी मिळणारे घरगुती गॅस सिलिंडर आता तीस दिवसांनी मिळत असल्याची माहिती आहे. त्याचबरोबर व्यावसायिक गॅस सिलिंडर मिळणे अत्यंत कठीण झाले आहे. काही ठिकाणी कमर्शिअल सिलिंडरचा पुरवठा बंद करण्यात आल्याचीही माहिती पुढे येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायावर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल आणि कॉटेज व्यावसायिक मोठ्या अडचणीत सापडण्याची शक्यता आहे.

# उरण पंचायत समितीवर लाल बावटा

- **सभापतीपदी शेकापचे महेश म्हात्रे बिनविरोध**
- **उपसभापतीपदी परेश ठाकूर यांची निवड**






**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण पंचायत समितीच्या सभापती व उपसभापती पदाची निवड बुधवारी (दि.११) उरण पंचायत समितीच्या कार्यालयात पीठासन अधिकारी अधिकारी तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी महाविकास आघाडीच्या शेतकरी कामगार पक्षाचे महेश म्हात्रे यांची सभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तर, उपसभापती महाविकास आघाडीचे शिवसेनेचे परेश ठाकूर यांचीदेखील बिनविरोध निवड करण्यात आली. त्यामुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण दिसून आले.

महाविकास आघाडीच्या निवडून आलेल्या दोन्ही सदस्यांची सभापतीपदी व पान ५ वर

## नवीन पनवेलमध्ये सिलिंडरसाठी रांगा




गॅस वितरक कार्यालयाबाहेर नागरिकांची मोठी गर्दी | महिलांपासून ज्येष्ठांपर्यंत तासन्तास प्रतीक्षेत

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल परिसरात घरगुती गॅस सिलिंडरच्या टंचाईमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, गॅस मिळवण्यासाठी ग्राहकांना पहाटेपासूनच रांगा लावाव्या लागत आहेत. जागतिक पातळीवर सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीचा परिणाम आता स्थानिक बाजारपेठेतही जाणवू लागल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. पान ५ वर

**निधीसाठी पाठपुरावा** | **शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचा पुढाकार**

# रेवदंड्यात अंतर्गत रस्त्याच्या कामाला सुरुवात



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील मोठे बंदर येथील अंतर्गत रस्त्याच्या कामाचा भूमीपूजन सोहळा मंगळवारी (दि.११) सकाळी मोठ्या उत्साहात झाला. या रस्त्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली असून, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या पुढाकाराने रस्त्यासाठी निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

शेकापचे रेवदंडा शहर चिटणीस निलेश खोत यांच्या हस्ते या कामाचा उद्घाटन समारंभ करण्यात आला. यावेळी रेवदंड्याच्या माजी सरपंच सोनाली मोरे, संदीप खोत, प्रमोद नवखारकर, शरद वरसोलकर, कृष्णा गायकर, दिलीप धुमाळ, संगीता हडकर, अनिल बाईत, राहुल गणपत आदींसह रेवदंडा येथील शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. रेवदंडा मोठे बंदर अंतर्गत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ भंडारी समाज हॉल येथे श्रीफळ वाढवून करण्यात आला. या रस्त्यासाठी निधीची मागणी निलेश खोत यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांनी केली होती.

शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रयत्नाने जिल्हा परिषद सेस फंडातून निधी मंजूर करण्यात आला. मोठे बंदर अंगणवाडी ते मयेकर चिक्कीवाले यांच्या घरापर्यंत हा रस्ता असणार आहे. रेवदंडा मोठे बंदर येथे अंतर्गत कॉंक्रिट रस्ता लवकरच चकाचक होणार असून, हा मार्ग स्थानिकांसह पर्यटकांसाठी सुकर होणार आहे.

# मिनिडोअर संघटनेच्या लढ्याला यश

**रिक्षा व टॅक्सीचे सरसकट ऑनलाईन परवाने वाटपाला स्थगिती**

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रिक्षा व टॅक्सीच्या सरसकट ऑनलाईन परवाना वाटपामुळे हा वाहतुकीचा व्यवसाय बुडीत जाण्याची भीती होती. प्रवासी संख्या कमी व वाहनांची संख्या जास्त होण्याचे संकट निर्माण झाले होते. या वाटपाच्या निर्णयाला रायगड जिल्हा मिनीडोअर चालक मालक संघटनेच्यावतीने विरोध केला होता. निवेदनही दिले होते. अखेर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी रिक्षा व टॅक्सीचे सरसकट ऑनलाईन परवाने वाटपाला स्थगिती दिली. मिनीडोअर संघटनेच्या लढ्याला यश आल्याचे जिल्हा मिनीडोअर संघटनेचे अध्यक्ष विजयभाऊ पाटील यांनी सांगितले.

मागेल त्याला सरसकट रिक्षा, टॅक्सीचे ऑनलाईन परवाने अर्थात परमिट देण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाची अंमलबजावणी पेण व पनवेल आरटीओ कार्यालयाने २०१७ पासून सुरुवात केली. रायगड जिल्ह्यातील भौगोलिक परिस्थितीचा व लोकसंख्येचा विचार न करता शासनाने सोडण्यात आलेल्या परवानांमुळे व्यवसायावर गदा येण्याचे संकट निर्माण झाले होते. प्रवासी वाहतुकीचा व्यवसायच बुडीत जाण्याची भीती व्यक्त करत २०१७ मध्ये रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढून शासनाच्या सरसकट मागेल त्याला परवाना वाटपाच्या निर्णयाला संघटनेच्या वतीने विरोध दर्शवला होता. रिक्षा व टॅक्सीचे परवाने बंद व्हावे यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू होते. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली रायगड जिल्हा संघटनेबरोबर सोमवारी (दि.९) मुंबई येथील विधान भवनात बैठक झाली. या बैठकीमध्ये सरसकट रिक्षा व टॅक्सीचे परवाने देण्यास तूर्तास स्थगित दिली असल्याची घोषणा त्यांनी केली. त्यामुळे अनेक वर्षे सुरू असलेल्या संघटनेच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.

२०१९ पासून रजिस्टर झालेल्या मीटर टॅक्सीना डिव्हाइस बसवण्याची सक्ती करण्यात आली होती. परंतु, १२ हजार रुपये खर्च करून ज्या टॅक्सीना पान ५ वर

## चटके बसू लागले

जनतेला दिलासा देणे हे सरकारचे काम असते. पण सतत नुसते, घाबरू नका, सर्व काही सुरळीत आहे असे म्हणत राहणे म्हणजे दिलासा नसतो. केंद्रातील मोदी सरकार सध्या नुसते हेच फुकाचे शब्द पुन्हापुन्हा उच्चारत आहे. आखातातील युध्दाचे थेट चटके आता भारतातील लोकांना बसू लागले आहेत. गॅसची टंचाई उग्र होत जाईल असे चिन्ह आहे. अमेरिका व इस्रायलने इराणवर हल्ला केल्याला ११ दिवस झाले. पहिल्याच दिवशी इराणचे सर्वोच्च नेते खामेनी व इतर नेत्यांना मारण्यात अमेरिकेला यश आले होते. त्यामुळे दोन-तीन दिवसात इराणला शरण येण्यास भाग पाडू असे अमेरिकेला बहुदा वाटत होते. ट्रम्प आणि त्यांचे मूर्ख सल्लागार यांनी अशी मनोराज्ये रचणे हे ठीक आहे. पण मोदी सरकारने स्थितीचा तटस्थ व नेमका आढावा घेण्याची गरज होती. युध्दाच्या पहिल्या दिवसापासूनच तेल व गॅसची टंचाई झाली तर काय उपाय करायचे याची योजना केली जायला हवी होती. पण जनतेने घाबरून जाऊ नये एवढेच सरकारचे प्रवक्ते म्हणत राहिले. आणि आता देशभर गॅस सिलेंडरच्या टंचाईचा प्रश्न विक्राळ होऊ लागला आहे. याच दरम्यान केंद्राने घरगुती गॅसच्या दरात चपळाईने ६० रुपयांची वाढ करून घेतली. पण त्याचा पुरवठा सुरळीत कसा होईल याचे नियोजन मात्र खालच्या एजन्सी वगैरेंवर सोपवले. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. मधल्या काळात हॉटेल वगैरे व्यावसायिकांनी टंचाईच्या भीतीने काळ्या बाजारात सिलेंडर खरेदी करून ठेवले. साहजिकच त्याचा पुरवठा रोडावला. मग हॉटेल तसेच खानावळी इत्यादींना सिलेंडर देण्यावर सरकारनेच निर्बंध आणले. यामुळे आता पुढच्या चार दिवसात अनेक शहरांमधील बरीचशी हॉटेल्स व छोट्या टपऱ्या इत्यादी बंद पडण्याचा धोका आहे. दुसरीकडे घरगुती सिलेंडरच्या गॅसची पळवापळवी चालू आहे. उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार आणि मध्य प्रदेश या भाजप शासित हिंदी पट्ट्यातच मोठा गोंधळ माजला आहे. लोक रात्रभर एजन्सीसमोर रांगा लावू लागले आहेत. उत्तर प्रदेशात सिलेंडर वाटपाच्या ठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येऊ लागला आहे. बिहार व पंजाबमध्ये अनेक दुकानांनी गॅस सिलेंडर नोंदवणे किंवा रिफील बुकिंग करणेच थांबवले आहे. राजस्थानात एकेक सिलेंडर २५०० रुपयांना विकला जाऊ लागला आहे.

### उद्योग बंद पडतायत

महाराष्ट्रात गॅस सिलेंडरची एक गाडीच पळवून नेली गेली असा आरोप विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी विधानसभेत केला. व्यावसायिक कामांसाठी गॅस वापरणाऱ्यांची तर सर्वाधिक पंचाईत आहे. टंचाईमुळे सर्वात लगेच त्यांचाच पुरवठा बंद करण्यात आला आहे. यामुळे छत्रपती संभाजीनगरमध्ये एलएनजी, एलपीजी, मिथेनॉल आणि पिचिंग ऑईल यांचा पुरवठा विस्कळित झाला असून त्यावर चालणारे ९० टक्के म्हणजे चार हजार कारखाने बंद पडणार आहेत. कोल्हापूर, सांगली वगैरे परिसरातील फौंड्री व इंजिनिअरिंगचे सुमारे ५०० कारखाने आहेत. ते बंद करावे लागले तर २५ हजार कामगारांचा रोजगार बुडणार आहे. मुंबई व परिसरातील अनेक बसेस, टॅक्सी तसेच रिक्षा सीएनजीवर चालतात. हा पुरवठा बंद झाला तर शहरेच बंद पडतील. या सगळ्या गोंधळानंतर सरकारला उशिरा जाग आली व त्याने एक तीन सदस्यीय समिती स्थापन केली. देशातील कंपन्यांना एलपीजीचे उत्पादन किमान दहा टक्क्यांनी वाढवण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. पण मुळात आपल्या गरजेच्या केवळ ३३ टक्के गॅस आपण बॉंबे हाय किंवा तशाच देशभर पसरलेल्या आपल्या स्वतःच्या उत्खनन प्रकल्पातून निर्माण करतो. ६७ टक्के गॅस आपण आयात करतो. त्यातही सुमारे ९० टक्के आयात आखाती देशातून केली जाते. कतार, ओमान, इराण, इराक अशा देशांचा यात समावेश आहे. हा गॅस आणण्यासाठी इराणची सामुद्रधुनी हाच सर्वात सोईचा, स्वस्त पडणारा व जवळचा मार्ग आहे. पण युध्दामुळे या मार्गाने होणारी वाहतूक बंद झाली आहे. हे नाक दाबले की जगाचे तोंड उघडते हा इराणचा जुना अनुभव आहे. त्यामुळे अमेरिका व इस्रायल हे दोघेही त्याच्याविरुध्द एकवटलेले असताना तर तो आपल्या हातातील या हुकुमी एक्क्याचा वापर करणार हे अपेक्षितच होते. त्यामुळे युध्द सुरु होताक्षणीच मोदी सरकारने संभाव्य टंचाईची शक्यता ध्यानी घ्यायला हवी होती. पण तसे झालेले दिसत नाही.

### घाबरणारे सरकार

आता दुसऱ्या सिलेंडरसाठी रिफील बुकिंग करण्याची मुदत २१वरून २५ दिवस करण्यात आली आहे. म्हणजेच जवळपास महिन्यात एकदाच नवीन बुकिंग करता येणार आहे. तसेच सामान्य कुटुंबाला एक गॅस दोन महिने किंवा अधिक सहज पुरतो. त्यामुळे याचा लगेच फटका त्या ग्राहकांना जाणवणार नाही. मात्र ज्यांच्याकडे दोन सिलेंडर नाहीत त्यांची पंचाईत होणार आहे. उज्वला योजनेखालच्या लाडक्या बहिणींना मोठा फटका बसेल. याचे सूत्रबध्द नियोजन केले जाणे अपेक्षित होते. ते झाले नाही. त्यातच इराणने कतारच्या गॅसनिर्मिती प्रकल्पावर हल्ला केल्याने तिथले उत्पादन थांबवण्यात आले आहे. याच प्रकल्पातून भारताला सर्वाधिक गॅस पुरवठा होत असतो. याचाच अर्थ आणखी चार दिवस जरी हा प्रकल्प बंद राहिला तर इकडे भारताची स्थिती बिकट होणार आहे. कारण गॅस ही काही खूप काळ साठवून ठेवली जाणारी वस्तू नाही. दुसरे म्हणजे गॅसच नव्हे तर पेट्रोलच्या पुरवठ्यालाही लवकरच फटका बसणार आहे. कारण आखातातील बहारीन, सौदी, संयुक्त अरब अमिरात इत्यादी देशांमधल्या तेलशुध्दीकरण केंद्रांवर हल्ले झाल्याने ती बंद करावी लागली आहेत. त्यामुळे जगातील तेलाचा पुरवठा बंद झाला असून त्याचे भाव गगनाला भिडू लागले आहेत. बराच काळ ६० डॉलर प्रतिबॅरलच्या आसपास असलेला तेलाचा भाव आता ११० डॉलरच्या आसपास गेला आहे. म्हणजेच इथून पुढे काही काळ तरी तेलाचा पुरवठा कमी होणार आहेच. शिवाय आपल्याला चढ्या दराने तेल खरेदी करावे लागणार आहे. डॉलरच्या तुलनेत आपला रुपया आधीच गटांगळ्या खातो आहे. या तेलसंकटामुळे तो आणखी खाली घसरणार आहे. त्यामुळे ज्या वस्तू आपण डॉलर मोजून परदेशातून आयात करतो त्या महाग होणार आहेत. म्हणजेच सरकारकडे लोकांच्या सोईसुविधांवर खर्च करण्यासाठी कमी पैसे शिल्लक राहणार आहेत. दुसरीकडे पेट्रोलचे दरही वाढवावे लागणार आहेत. त्याचे परिणाम सर्वच क्षेत्रांमध्ये जाणवणार आहेत. सध्या संसदेचे अधिवेशन चालू आहे. या सर्व प्रश्नांची आणि त्यावरच्या सरकारच्या उपायांची गंभीर चर्चा तिथे होऊ शकते. पण सरकारने सोमवारी एकतर्फी एक निवेदन करून हा प्रश्न संपवण्याचा प्रयत्न केला. या विषयावर चर्चा करण्यास नकार दिला. यामध्ये खामेनींच्या हत्येचा मोदी सरकारने निषेध का केला नाही हा मुद्दा जोरकसपणे पुढे येण्याची शक्यता होती. त्याला घाबरूनच सरकारने पळ काढलेला दिसतो. पण पुढच्या काळात नागरिकांना बसणारे चटके वाढतच जाणार आहेत.

विचार

# लॉजिस्टिक्स क्षेत्राची भरारी

***अलिकडील वर्षांमध्ये जलद सेवांच्या वाढत्या ग्राहक मागणीमुळे आणि ई-कॉमर्सच्या विस्तारामुळे 'एक्सप्रेस लॉजिस्टिक्स' विभागात चांगली वाढ दिसून आली आहे. उद्योग अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२५ पर्यंत भारतातील 'एक्सप्रेस लॉजिस्टिक्स उद्योगा'चे मूल्य सुमारे ९ अब्ज डॉलर होते. २०३० पर्यंत सुमारे १९ टक्के 'सीएजीआर'ने वाढ होऊन बाजारमूल्य सुमारे २२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.***



प्रा. सुखदेव बखळे

भारताचे लॉजिस्टिक्स क्षेत्र वार्षिक वाढीचा दर (सीएजीआर) आणि सकारात्मक घडामोडींमुळे आकाराला आला आहे. २०२५ पर्यंत या क्षेत्राचे मूल्य ३२० अब्ज डॉलरपेक्षा अधिक असेल, असा अंदाज होता. या क्षेत्राने २०२१ मधील सुमारे २१५ अब्ज डॉलरवरून दहा टक्क्यांहून अधिक 'सीएजीआर' नोंदवला आहे. सध्या हे क्षेत्र व्यापार आणि वाणिज्याचा कणा म्हणून कार्य करते आणि अर्थव्यवस्थेच्या एकूण वाढीला पाठबळ देते. ही वाढ प्रामुख्याने वाढती ग्राहक मागणी, 'ई-कॉमर्स' तसेच 'क्विक कॉमर्स'ची झपाट्याने वाढ आणि धोरणात्मक पाठबळ यामुळे प्रेरित झाली आहे. या क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या एकात्मिकरणामुळे कार्यक्षमतेत वाढ झाली असून कामगिरी सुधारली आहे, तर साठवण आणि वाहतूक पायाभूत सुविधांच्या विकासामुळे विस्तार साधला गेला आहे. गेल्या काही दशकांपासून मालवाहतुकीची हालचाल रस्ते आणि रेल्वेकडे झुकली आहे. अलीकडच्या वर्षांमध्ये रस्त्यांचा हिस्सा जवळपास ७० टक्के तर रेल्वेचा हिस्सा २० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. रस्ते शेवटच्या टप्प्यातील (लास्ट-माईल) वितरणासाठी अत्यावश्यक दुवा म्हणून कार्य करतात आणि घरपोच सेवा सुलभ करतात, मात्र लांब पल्ल्याच्या वाहतुकीसाठी हा पर्याय अधिक खर्चिक आणि वायू प्रदुषणाला कारणीभूत ठरतो. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पर्यायी माध्यमांचा हिस्सा वाढवण्याचे प्रयत्न सुरू असून २०३० पर्यंत रस्ते वाहतुकीचा हिस्सा ५० टक्क्यांखाली आणण्याचे लक्ष्य आहे. हा बदल प्रामुख्याने रेल्वेला लाभदायक ठरेल, अशी अपेक्षा आहे. रस्त्यांच्या तुलनेत रेल्वेमार्गे वाहतुकीचा खर्च जवळपास निम्मा असून पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम लक्षणीयरीत्या कमी आहे.

२०१४ पासून अतिरिक्त २,६७२ दशलक्ष टन माल रेल्वेकडे वळवण्यात आला असून त्यामुळे १४३.३ दशलक्ष टन कार्बन उत्सर्जनाची बचत झाली आहे. सरकारने २०३० पर्यंत एकूण मालवाहतुकीतील रेल्वेचा हिस्सा सुमारे ४५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य समोर ठेवले आहे. त्याला 'कार्बन लॉजिस्टिक्स योजने'सारख्या उपक्रमांमुळे मदत होऊ शकेल. याशिवाय समर्पित मालवाहतूक कॉरिडॉरचा विकास व्हावा, उद्योगांनी आपला माल रेल्वेकडे वळवण्याची प्रवृत्ती वाढवावी तसेच रेल्वे आर्थिक कॉरिडॉर, हे लक्ष्य साध्य करण्यात ही योजना मदत करत आहे. त्यासाठी एकूण ३०६ गती शक्ती कार्गो टर्मिनल्सना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी ११८ सुविधा सुमारे १९२ दशलक्ष टन प्रति वर्ष हाताळणी क्षमतेसह कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. सध्या अंतर्देशीय जलमार्गांद्वारे मालवाहतुकीला वेग आला आहे. २०२४-२५ दरम्यान मालवाहतूक विक्रमी १४५.५ दशलक्ष टन इतकी झाली. २०२३-२४ च्या तुलनेत ती नऊ टक्क्यांनी जास्त आहे आणि २०१३-१४ पासून २० टक्क्यांनी जास्त 'सीएजीआर' नोंदवते. जुलै २०२५ पर्यंत २९ कार्यरत राष्ट्रीय जलमार्गांपैकी २६ मार्गांवर मालवाहतूक कार्य सुरू आहे. पुढे पाहता, 'मेरीटाइम अमृत काळ व्हिजन' अंतर्गत २०३० पर्यंत २०० दशलक्ष मेट्रिक टनांपेक्षा अधिक आणि २०४७ पर्यंत ५०० दशलक्ष टनांपेक्षा अधिक माल हाताळण्याची अपेक्षा आहे. 'जलवाहक' योजनेसारख्या योजना आणि करसुधारणा यांसारख्या अनुकूल नियामक उपाययोजनांद्वारे याला प्रोत्साहन देण्यात आले आहे.

आज देशात वाढत्या उत्पादनामुळे वेअरहाउसिंग आणि साठवणुकीच्या जागांची सातत्यपूर्ण मागणी निर्माण झाली आहे. उद्योग अहवालानुसार दिल्ली-एनसीआर, मुंबई, पुणे, बंगळुरू, चेन्नई, कोलकाता, हैदराबाद आणि अहमदाबाद या आठ प्रमुख शहरांमध्ये ग्रेड 'ए' आणि 'बी' वेअरहाउसिंग साठा २०२४ पर्यंत ४३८ दशलक्ष चौरस फुटांपेक्षा अधिक होता. यात ग्रेड 'ए' सुविधांचा साठा २३८ दशलक्ष चौरस फुटांपेक्षा अधिक होता. तसेच उदयोन्मुख टियर २ आणि टियर ३ शहरांमधील एकूण वेअरहाउसिंग साठा ९५ दशलक्ष चौरस फूट इतका होता. २०२८ पर्यंत आठ प्रमुख शहरांमध्ये सुमारे ७०० दशलक्ष चौरस फूट साठा अपेक्षित आहे. महानगरांबाहेरील आणि टियर २ व टियर ३ शहरांमध्ये वेअरहाउसिंग सुविधांची मागणी वाढली आहे. या प्रदेशांमध्ये उत्पादन साखळीचा विस्तार आणि ग्राहक मागणी वाढत आहे. या मागणीची पूर्तता करण्यासाठी येथे वेअरहाउस आणि फुलफिलमेंट सेंटर्स स्थापन केली जात आहेत. अन्नसुरक्षेवर भर देत कृषी उत्पादनांच्या साठवण सुविधांना बळकटी देण्यासाठीही उल्लेखनीय प्रयत्न करण्यात आले आहेत. १ नोव्हेंबर २०२५ पर्यंत, भारतीय अन्न महामंडळ (एफसीआय) आणि राज्य सरकारी संस्थांकडे अन्नधान्य साठवणीसाठी उपलब्ध एकूण आच्छादित आणि प्लिंथ (सीएपी) केंद्रीय साठा क्षमता सुमारे ९२ दशलक्ष टन इतका होती. यापैकी सुमारे ४८ दशलक्ष टन 'एफसीआय'कडे आणि सुमारे ४३ दशलक्ष टन राज्य संस्थांकडे आहे. त्यात राज्यांच्या वखार महामंडळांचा समावेश आहे.

'एफसीआय' स्वतःच्या आणि भाड्याने घेतलेल्या २,५४४ गोदामांचे संचालन करते. त्यापैकी सुमारे ६० टक्के उत्तरेकडील क्षेत्रात केंद्रित आहेत. 'सेंट्रल वेअरहाउसिंग कॉर्पोरेशन' ७४१ गोदामांचे संचालन करते. त्यांची क्षमता १४.९ दशलक्ष टन आहे. याशिवाय सप्टेंबर २०२५ पर्यंत शीतगृहांची संख्या ८,८१० पेक्षा अधिक होती. 'मल्टीमोडल लॉजिस्टिक्स पार्क्स' हे आंतरमाध्यमीय जोडणी, माल एकत्रीकरण आणि समकलनासाठी कार्यक्षम केंद्र म्हणून संकल्पित आहेत. रस्ता वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने बंगळुरू, चेन्नई, इंदूर, जालना, जोगीघोपा आणि नागपूर येथे सहा 'मल्टीमोडल लॉजिस्टिक्स पार्क्स' मंजूर केले आहेत. हे विविध विकास टप्प्यांमध्ये असून नागपूर येथे २०२५ मध्ये कार्य सुरू झाले आहे. तसेच, अनंतपूर, नाशिक आणि पुणे येथील 'मल्टीमोडल लॉजिस्टिक्स पार्क्स' सध्या निविदा प्रक्रियेत आहेत. याशिवाय इतर अनेक प्रकल्प येऊ घातले आहेत. 'कंटेनर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया'द्वारेही 'मल्टीमोडल लॉजिस्टिक्स पार्क्स' नियोजित आणि विकसित केले जात आहेत. खासगी क्षेत्रातील कंपन्या धोरणात्मक ठिकाणी अत्याधुनिक सुविधा आणि सुधारित माध्यमीय जोडणीसह लॉजिस्टिक्स आणि औद्योगिक पार्कमध्ये गुंतवणूक करत आहेत.

उत्पादन केंद्रांपासून अंतिम ग्राहकांपर्यंत वस्तूंची हालचाल पुरवठा साखळीच्या विविध टप्प्यांमधून होते. त्यात पॅकेजिंग, साठवणूक, वाहतूक आणि शेवटच्या टप्प्यातील वितरणाचा समावेश आहे. वाढती उत्पादन मात्रा आणि पुरवठा साखळीतील गुंतागुंत यामुळे कंपन्या विविध प्रक्रिया व्यवस्थापनासाठी साठवण, वाहतूक, 'रिव्हर्स लॉजिस्टिक्स', 'ऑटोमेशन आणि एंड-टू-एंड सोल्यूशन्स'साठी तृतीय पक्ष (थ्री पीएल) आणि चौथा पक्ष (फोर पीएल) लॉजिस्टिक्स सेवा प्रदात्यांवर अधिक अवलंबून आहेत. तांत्रिक कौशल्यामुळे हे सेवा प्रदाते कार्यक्षमता वाढवण्यास, खर्च कमी करण्यास आणि कार्यप्रवाहात दृश्यमानता वाढवण्यास मदत करतात. पुरवठा साखळी सेवांना आकार देणारी एक महत्त्वाची प्रवृत्ती म्हणजे तंत्रज्ञानाचे एकात्मिकरण आणि प्रक्रियांचे डिजिटायझेशन. 'वेअरहाउस ऑपरेशन्स इन्व्हेंटरी' व्यवस्थापन प्रणाली, स्वयंचलित प्रक्रिया आणि मनुष्यबळ आवश्यकता कमी करण्यासाठी रोबोट्सच्या वापराद्वारे अधिक सक्षम झाले आहेत. भविष्यातील विस्तार लक्षात घेऊनही या सुविधा उभारल्या जात आहेत. वाहतूक आणि शेवटच्या टप्प्यातील वितरणामध्ये 'ऑप्टिमाइज्ड रूटिंग'मुळे वितरण वेळ कमी झाला असून इंधन वापराचे अनुकूलन झाले आहे. कार्यक्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित होत असताना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) सारख्या प्रगत तंत्रज्ञानाचे एकात्मिकरण अपेक्षित आहे. 'नेट-झिरो' उद्दिष्टांशी सुसंगतपणे कार्बन फूटप्रिंट कमी करण्यासाठी उल्लेखनीय उपक्रम राबवले जात आहेत.

'वेअरहाउस ऑपरेशन्स'साठी अपारंपारिक ऊर्जेचा वाढता वापर, ऊर्जा-कार्यक्षम उपकरणांची तैनाती आणि नैसर्गिक प्रकाशाचा अधिक वापर केला जात आहे. विशेषतः शेवटच्या टप्प्यातील वितरणासाठी वाहतूक क्षेत्रात इलेक्ट्रिक आणि 'एलएनजी'चलित वाहने लक्षणीय प्रमाणात स्वीकारली जात आहेत. राज्यस्तरीय लॉजिस्टिक्स धोरणे आणि शहर लॉजिस्टिक्स योजना प्रादेशिक समस्यांचे निराकरण करण्यास आणि त्या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेशी सुसंगत संधी ओळखण्यास मदत करत आहेत. हे क्षेत्र २०३० पर्यंत ५२० अब्ज डॉलरपेक्षा अधिक बाजारमूल्य गाठण्याची अपेक्षा आहे. लॉजिस्टिक्स खर्च जीडीपीच्या दहा टक्क्यांखाली आणण्यावरही अधिक भर दिला जात आहे. 'एआय' आणि ऑटोमेशन या क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवतील, अशी अपेक्षा आहे. उत्पादनवाढीसोबत संबंधित साठवण पायाभूत सुविधा आणि मल्टीमोडल एकात्मिकरणाचा पुरेसा विकास सुनिश्चित करणे ही या उद्दिष्टांची पुर्तता करण्यासाठी अत्यावश्यक बाब ठरेल.

**(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

चर्चा आजची

# आठवडा बाजार अर्थव्यवस्थेचे केंद्र



अंतरा पारंगे

घरबसल्या मोबाईलच्या एका क्लीकवर ऑनलाईन खरेदी करण्याचा क्रेझ जिल्ह्यात प्रचंड आहे. दैनंदिन जीवनातील प्रत्येक गोष्ट ऑनलाईन खरेदी करता येते. यासाठी वेगवेगळ्या कंपन्या उपलब्ध आहेत. आपल्याला हवी ती आणि हवी तशी वस्तू आपण खरेदी करू शकतो. त्याचप्रमाणे खरेदीसाठी शहरात मोठं मोठी दुकाने, मॉल्स असतात. मात्र तरीदेखील ग्रामीण भागात आजही आठवडा बाजार आजही मोठ्या दिमाखात उभा आहे. आजही या आठवडा बाजारात नागरिकांची खरेदीसाठी मोठी गर्दी दिसून येते.

शेतकरी आपल्या शेतातील भाजी, वाल आदी उत्पादीत केलेला माल थेट आठवडा बाजारात विकतात. तसेच विक्रेते थेट ताज्या भाज्या, फळे, घरगुती वस्तू आणि कपडे, खेळणी स्वस्त दरात विकतात. ग्राहकांनादेखील पाहिजे असलेल्या वस्तू, खाद्य पदार्थ स्वस्त दरात आणि एका छताखाली मिळण्याचे साधन निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे एकाच वस्तूची अनेक दुकाने असल्याने ग्राहकांना हवी तशी वस्तू त्यांना परवडणाऱ्या किंमतीत खरेदी करता येते. त्यामुळे ग्राहकांची आर्थिक बचत होऊन स्थानिक व्यावसायिकांना रोजगाराचे दालन खुले झाले आहे. एकंदरीत आठवडा बाजारातून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे केंद्र बनत आहे.

पूर्वी तालुक्याच्या ठिकाणी खरेदीसाठी जावे लागत होते. मात्र दळणवळणाची साधने फारसी नव्हती. त्यामुळे वेळ, पैसा आदी खर्च मोठ्या प्रमाणात होत असत. परंतू जिल्ह्यातील गावे, वाड्यांमधील पिकविलेला माल स्वस्त दरात ग्राहकांपर्यंत पोहचता यावा, यासाठी जिल्ह्यात आठवडा बाजारची संकल्पना उदयास आली. या बाजारात ग्रामीण व शहरी भागात शेतकरी व विक्रेते थेट ताज्या भाज्या, फळे, घरगुती वस्तू आणि कपडे स्वस्त दरात विक्री करतात. ज्या ठिकाणी भरपूर दुकाने नाहीत किंवा ज्या ठिकाणी जाणे सोयीचे व आर्थिक दृष्ट्या परवडणारे असेल अशा ठिकाणी हे बाजार भरविले जातात. वेगवेगळ्या ठिकाणी हे बाजार भरत असून प्रत्येक बाजारासाठी एक विशेष दिवस ठरलेला असतो. जसे की, पोयनाड येथील आठवडा बाजार दर सोमवारी, रामराज येथील आठवडा बाजार शनिवारी आणि नागाव येथील आठवडा बाजार गुरुवारी, सहाण येथील आठवडा बाजार रविवारी सुरु झाला. या आठवडा बाजारांना अनेक वर्षांची परंपरादेखील लाभली आहे. आजही आठवडा बाजार मोठ्या दिमाखात डोलत आहेत.

लॉकडाऊननंतर जिल्ह्यात ऑनलाईन खरेदीवर अधिक भर देण्यात आला. वेगवेगळ्या ॲपद्वारे घरबसल्या वस्तू, खाद्य पदार्थ मागविण्याची पध्दत सुरू झाली. त्यामुळे आठवडा बाजार लुप्त होण्याची चिंता अनेकांना निर्माण झाली होती. परंतु, आजही या आठवडा बाजारांना वाल, पावटा, तूर, हारभरा अशा अनेक प्रकारचे कडधान्य, तसेच कलिंगड बाजारात विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात येत आहे. या कडधान्यांसह फळ पिकांना ग्राहकांकडून मागणी देखील मोठ्या प्रमाणात आहे. बाजारपेठेच्या गावाला लागून असणाऱ्या अनेक गावांमधून शेतकरी आपला माल विकायला आठवडी बाजारपेठेत येतात.

ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शेतकरी, आदिवासी नागरिक भाजीपाला, कडधान्य, फळं-फुल लागवड करतात. कलिंगडाचीदेखील मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. वाढत्या उकाड्यात कलिंगडांना मोठी मागणी असते. त्यामुळे स्थानिक शेतकरी, व्यावसायिकांना हक्काची बाजारपेठ मिळून आपला माल थेट विकण्याची संधी मिळते. आपला माल घेऊन उन्हातान्हात इतरत्र घेऊन फिरावे लागत नाही. त्यामुळे त्यांचा वाहतूक खर्च देखील वाचतो आणि अधिक आर्थिक फायदा होतो. फक्त स्थानिकांनाच नाही तर पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांनाना सुद्धा या बाजारात हव्या असलेल्या वस्तू दर्जेदार आणि योग्य किमतीत मिळतात. या आठवडा बाजारातून मोठ्या प्रमाणात लहान मुलांची खेळणी, व अन्य खाद्य पदार्थ खरेदीची लूट होत आहे.

परंतु, काही बाजारपेठेत सोयीसुविधांची कमतरता असल्याचे दिसून येते. यासाठी बाजाराची गावे पक्क्या रस्त्यांना जोडली गेली पाहिजेत. आठवडी बाजाराच्या गावात बाजाराच्या ठिकाणी पिण्याचे पाणी, स्वच्छता, अंधार पडला तर दिव्याची सोय याचा विचार केला गेला पाहिजे. ठिकठिकाणी कचरा कुंड्या ठेवण्यात याव्यात. त्यामुळे स्वच्छता राखण्यास मदत होईल.

स्वस्त दरात आणि ताजा माल मिळत असल्याने आठवडा बाजारात खरेदीसाठी मोठी गर्दी होते. जिल्हा आधुनिक व ऑनलाईनच्या वाटेवर असला, तरी आठवडा बाजारात खरेदी करण्याला पसंती कायम आहे. आठवडा बाजार या ऑनलाईनच्या जगतामध्ये ताठ मानेने उभा असल्याचे दिसून येत आहे.

लोकसंसद

## 'अरिबाडा' हा निसर्गाच्या जैवविविधतेचा आनंदोत्सव!

'लेपिडोकेलिस ऑलिव्हेशिया' हे शास्त्रीय नाव असलेल्या तीन लाखांहून अधिक 'ऑलिव्ह रिडले' समुद्री कासवांनी अंडी घालण्यासाठी ओडिशाच्या किनाऱ्यावरील गहिरमथा आणि रुषिकुल्या येथील सागरकिनाऱ्यावर या हंगामात एकच गर्दी केली आहे. ओडिशाच्या किनाऱ्यावर दरवर्षी घडणाऱ्या ऑलिव्ह रिडले समुद्री कासवांच्या सामूहिक अंडी घालण्याच्या या नैसर्गिक घटनेला 'अरिबाडा' असे म्हटले जाते आणि निसर्गाच्या हा अद्भुत चमत्कार पाहण्यासाठी आणि अनुभवण्यासाठी देशोदेशीचे संशोधक, पर्यावरणप्रेमी, पर्यटक येथे ठाण मांडून बसतात. रात्रीच्या अंधारात बंगालच्या उपसागरातून लाखो मादी कासवे अंडी घालण्यासाठी एकाचवेळी बाहेर पडतात त्यावेळच्या विलोभनीय दृश्याने उपस्थितांचे मन मोहून जाते. संशोधकांनी या कासवांवर सॅटेलाईट ट्रान्समीटर बसवून त्यांचा सागरी प्रवास जाणून घेण्याचा प्रयत्न केला तेव्हा असे आढळून आले की ही कासवे सरासरी पाच हजार किलोमीटरचा प्रवास करून या ठिकाणी अंडी घालण्यासाठी येतात. मात्र एकीकडे 'अरिबाडा' हा निसर्गाच्या जैवविविधतेचा आनंदोत्सव साजरा करत असतानाच गहिरमथा सागरी अभयारण्यातील एकाकुला समुद्रकिनाऱ्यापर्यंत २५ किमी अंतरावर ऑलिव्ह रिडले सागरी कासवांचे सुमारे १५०० मृतदेह अलीकडेच किनाऱ्यावर वाहून आल्याची घटना उघडकीस आली. मोठमोठ्या यांत्रिक ट्रॉलर्सनी केलेल्या बेकायदेशीर मासेमारीच्या कारवायांमुळे तसेच प्लास्टिक प्रदूषणामुळे समुद्रकिनाऱ्यांवर कासवांचे मोठ्या प्रमाणात अपघाती मृत्यू होत असल्याचे आढळून आले आहे. 'अरिबाडा'साठी ही चिंतेची बाब आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

दिनविशेष

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राष्ट्रीय राजकारणातले द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांची आज जयंती. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले.

महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीतही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ सालच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली यशवंतरावांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले.

द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राचे स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले. देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आले अशावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावून त्यांची देशाच्या संरक्षणमंत्री नेमणूक केली. परकीय आक्रमणाच्या वेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पेलली.

१९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरित्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तणखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढीला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाच्या उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले.

महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे, तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले.

यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते. भारतीय राजकारतील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या जयंतीदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# सागाव नदीत बेकायदेशीर उत्खनन

■ तहसीलदारांचे दुर्लक्ष, महसूल यंत्रणा बघ्याच्या भूमिकेत

■ तक्रारीनंतरही कारवाई नाही; शेतजमिनी धोक्यात, शेतकऱ्यांचा संताप

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

बेकायदेशीर रेती व खडी उत्खननावर शासनाने बंदी घातलेली असतानाही अलिबाग तालुक्यातील सागाव नदीपात्रात खुलेआम अनधिकृत उत्खनन सुरू असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणाकडे स्थानिक महसूल प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत असून, तलाठी व मंडळ अधिकारी बघ्याची भूमिका घेत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. अलिबागच्या तहसीलदारांकडूनही या उत्खननाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे बोलले जात असून, तक्रारी करूनही प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याने स्थानिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

अलिबाग तालुक्यातील सागाव नदीलगत मोठ्या प्रमाणात शेतजमिनी असून, या नदीचे पाणी परिसरातील शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. भाजीपाला तसेच इतर पिकांच्या लागवडीसाठी या नदीच्या पाण्याचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. मात्र, सध्या नदी कोरडी पडल्याचा फायदा घेत सागर वेळे नावाच्या व्यक्तीने कोणतीही शासकीय परवानगी न घेता नदीपात्रातून खुलेआम खडी व मातीचे उत्खनन केल्याचे समोर आले आहे. जेसीबीच्या साहाय्याने नदीपात्रात खोदकाम करून मोठ्या प्रमाणावर खडी-माती काढली जात असल्याचे स्थानिकांनी सांगितले आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून सागाव नदीत हे उत्खनन सुरू असतानाही संबंधित तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई न करता केवळ बघ्याची भूमिका घेतल्याची चर्चा आहे. संबंधित व्यक्तीविरोधात स्थानिक प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. या उत्खननामुळे नदीलगत असलेली पाच एकरांहून अधिक शेतजमीन धोक्यात आली असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. पावसाळ्यात नदीला पूर आल्यास पाण्याचा प्रवाह बदलून उधाणाचे पाणी थेट शेतजमिनीत घुसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## महसूलमंत्र्यांकडेही तक्रार दाखल

सागाव नदीतून राजरोसपणे रेती-खडीचे उत्खनन करून त्याची वाहतूक केली जात असल्याचा आरोप करत स्थानिक प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करण्यात आल्या. मात्र, त्यानंतरही कारवाई न झाल्याने अखेर शेतकरी ज्ञानेश्वर खराडे यांनी थेट महसूलमंत्र्यांकडे तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणात महसूलमंत्री काय भूमिका घेणार आणि संबंधितांवर कारवाई होणार का, याकडे आता परिसरातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.




त्यामुळे जमिनीची धूप होऊन शेतीचे मोठे नुकसान होऊ शकते.

या भागात भातशेतीसह कांदा, वाल यांसारख्या पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. मात्र, नदीपात्रातील अनधिकृत उत्खननामुळे या पिकांनाही धोका निर्माण झाला आहे. या प्रकरणाविरोधात स्थानिक शेतकरी ज्ञानेश्वर खराडे यांनी आवाज उठविला आहे. कार्ले गावाजवळ नदीलगत त्यांची शेतजमीन असून, उत्खननामुळे त्यांच्या शेतीवरही संकट ओढवण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे.

पावसाळ्यात नदीतून वाहून आलेल्या गाळामध्ये रेती, खडी व माती साचलेली असते. याच गाळाचा उपसा खंडाळे-ढोलपाडा येथील सागर वेळे यांनी केल्याचा आरोप करण्यात आला आहे. एमएच ४० सीए २३५ या क्रमांकाच्या जेसीबीद्वारे नदीपात्रात खोदकाम करून एमएच ०६ एजी ८०७३ या क्रमांकाच्या डंपरमध्ये रेती-खडी भरून त्याची वाहतूक करण्यात आल्याचेही स्थानिकांनी सांगितले आहे. ही रेती-खडी एका धनदांडग्या व्यक्तीच्या जागेत भरावासाठी बेकायदेशीररित्या नेली जात असल्याचेही आरोप करण्यात येत आहेत.

शासनाचा महसूल बुडवत हा अवैध व्यवसाय दिवस-रात्र सुरू असल्याची चर्चा परिसरात आहे. काहींच्या राजकीय वरदहस्तामुळेच संबंधित व्यक्ती हे अनधिकृत उत्खनन करत असल्याचा आरोपही स्थानिकांकडून केला जात आहे. नदीपात्रातील खोदकामामुळे पावसाळ्यात पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. तसेच या उत्खननाचा परिणाम आसपासच्या शेतीवर होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होऊ शकते. शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवितालाही धोका निर्माण होऊ शकतो, असे ज्ञानेश्वर खराडे यांनी नमूद केले आहे.

या सर्व बाबींची माहिती त्यांनी अलिबाग तहसीलदारांना दिली असून याबाबत लेखी तक्रार करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मात्र, अद्याप कोणतीही कारवाई होत नसल्याने महसूल विभागाच्या भूमिकेबाबत स्थानिकांमध्ये नाराजीचे सूर उमटू लागले आहेत.

पान ३ वरून

## ४५ हजार कंटेनर्सची कोंडी

पाठवण्यात आले होते, मात्र तेही विविध ठिकाणी अडकले. यातील अनेक कंटेनर्समध्ये नाशवंत माल असल्यामुळे तो आधीच खराब झाला आहे. त्याचबरोबर शिपिंग कंपन्यांकडून युद्धधोका अधिभार, खर्च वसुली अधिभार आणि पीक सिझन शुल्क आकारले जात असल्याने माल वाहतुकीतून मिळणारा उरलेला नफाही संपुष्टात आला आहे. सध्या प्रत्येक कंटेनरवर युद्धस्थितीमुळे तीन हजार ते पाच हजार डॉलर्सपर्यंत अतिरिक्त अधिभार आकारला जात आहे. परिणामी, मध्यपूर्वेतील युद्धाचा सर्वाधिक फटका भारतीय निर्यातदार आणि लॉजिस्टिक्स क्षेत्राला बसताना दिसत आहे.

## अडकलेल्या कंटेनरप्रकरणी नाना पाटोले यांची पाहणी

अधिकाऱ्यांची भेट घेण्यापूर्वी पटोले यांनी बंदर संचालित पार्किंगला भेट देत तेथील कंटेनर आणि संबंधित व्यापाऱ्यांशी भेट घेत चर्चा केली. जेएनपीए प्रशासनाकडून माहिती घेत असताना, पाटोले यांनी जेएनपीए प्रशासन माहिती लपवत असल्याचा आरोप केला आहे. आयात-निर्यातीवर झालेल्या परिणामाची माहिती बाहेर येऊ नये यासाठी केंद्र सरकारकडून अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. या परिस्थितीमुळे शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, हे दुर्लक्षित करता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. याप्रकरणी विधानसभेत मुद्दा उपस्थित करणार असल्याचे सांगत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही पत्र लिहिणार असल्याचे सांगितले. सरकारच्या अनास्थेमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे स्पष्ट होत असून, या परिस्थितीस केंद्र आणि राज्य सरकार जबाबदार असल्याचे परखड मत नाना पाटोले यांनी पाहणीदरम्यान 'कृषीवल'शी बोलताना व्यक्त केले. एकंदरीत, आखाती देशामधील परिस्थितीमुळे भारतीय व्यापारावर परिणाम झाला असून, हजारो कंटेनर माल बंदरामध्ये अडकून राहिला आहे. यामध्ये फळं, भाज्या, मास यासारखे नाशिवंत माल मोठ्या प्रमाणात असल्याने येथील व्यापारी, निर्यातदार आणि शेतकरी यांचे मोठे नुकसान झाले आहे. अशा प्रकारची उद्भवलेली आपत्ती पाहता शेतकरी देशोधडीला लागला आहेच, व्यापारी आणि निर्यातदार यांचेही प्रचंड नुकसान झाले आहे. यामुळे नुकसानग्रस्तांना भरापाई मिळाली पाहिजे, आशी भूमिका यावेळी पटोले यांनी मंडली आहे.

## रायगडात पर्यटन, हॉटेल संकटात

उचलावीत, अशी मागणी अनेक व्यावसायिकांकडून केली जात आहे. रायगड जिल्ह्यातील समुद्रकिनारे, ऐतिहासिक गडकिल्ले आणि लेणी पर्यटकांना कायमच आकर्षित करतात. त्यामुळे अलिबागसह नागाव, रेवदंडा, काशीद, श्रीवर्धन, दिवेआगर आणि दिघी या समुद्रकिनारी भागांमध्ये पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतात. मुंबई, पुणे तसेच इतर शहरांतील नागरिक शांतता आणि विश्रांती मिळावी यासाठी सुट्टीच्या काळात आवर्जून रायगड जिल्ह्याला भेट देतात. दरवर्षी दहा लाखांहून अधिक पर्यटक रायगड जिल्ह्यात येत असल्याचे सांगितले जाते. पर्यटनामुळे हॉटेल, कॉटेज आणि अन्य संबंधित व्यवसायांना मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. विशेष म्हणजे, रायगडमध्ये येणारे पर्यटक घरगुती जेवणांचा आस्वाद घेण्याला अधिक प्राधान्य देतात. त्यामुळे पर्यटनवाढीसाठी विविध माध्यमांतून प्रयत्न केले जात असतात. मात्र, सध्या पर्यटनावर आधारित असलेला हा व्यवसाय आर्थिक संकटात सापडण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. आखाती देशांमध्ये गेल्या काही दिवसांपासून युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीचे परिणाम आता रायगड जिल्ह्यातही दिसू लागले आहेत. गॅसचा तुटवडा जाणवू लागला असून पूर्वी पंधरा दिवसांनी मिळणारे घरगुती गॅस सिलेंडर आता तीस दिवसांनी मिळत असल्याची माहिती आहे. त्याचबरोबर कमर्शिअल गॅस सिलेंडर मिळणे अत्यंत कठीण झाले आहे. काही ठिकाणी कमर्शिअल सिलिंडरचा पुरवठा बंद करण्यात आल्याचीही माहिती पुढे येत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटन व्यवसायावर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पर्यटनावर अवलंबून असलेले हॉटेल आणि कॉटेज व्यावसायिक मोठ्या अडचणीत सापडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्या पर्यटकांची संख्या तुलनेने कमी असली तरी परीक्षा संपल्यानंतर पर्यटनाचा हंगाम सुरू झाल्यावर परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कमर्शिअल गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने प्रयत्न करावेत, अशी मागणी व्यावसायिकांकडून होत आहे. सध्या कमर्शिअल गॅस सिलेंडर मिळत नसल्याने पर्यटकांची संख्या वाढल्यानंतर पदार्थ तयार करण्यासाठी गॅस सिलिंडर कुठून आणायचा, असा प्रश्न हॉटेल आणि पर्यटन व्यावसायिकांसमोर उभा राहणार आहे.

## हरीशला मिळणार इच्छामरण

शस्त्रक्रियेने प्रत्यारोपित केलेल्या पीईजी ट्यूबद्वारे राणा केवळ क्लिनिकली ॲडमिनिस्टर्ड न्यूट्रिशनवर जगत आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, रुग्णाच्या पालकांनी आणि प्रथम आणि द्वितीय वैद्यकीय मंडळांनी असा निष्कर्ष काढला आहे की, वैद्यकीयदृष्ट्या प्रशासित पोषण बंद करावी, कारण ते रुग्णाच्या हिताचे नाही. खंडपीठाने असे नमूद केले की, एकेकाळी तरुण, हुशार मुलगा हरीश राणा, त्याच्या पेइंग गेस्ट (पीजी) निवासस्थानाच्या चौथ्या मजल्यावरून पडल्यानंतर एक दुःखद अपघात झाला, ज्यामुळे त्याचे आयुष्य बदलले. खंडपीठाने असे नमूद केले की, त्याच्या मेंदूच्या दुखापतीमुळे तो १०० टक्के क्वाड्रिप्लेजिया (पॅरालिसिसचा एक प्रकार)सह सतत दीर्घकालीन सुप्तावस्थेत राहिला आणि वैद्यकीय अहवालांवरून असे दिसून आले आहे की, गेल्या १३ वर्षांत त्याची प्रकृती सुधारलेली नाही.

## उरण पं.स.वर लाल बावटा

उपसभापतीपदी निवड झाल्यामुळे महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. यावेळी नवनिर्वाचित सभापती महेश म्हात्रे व उपसभापती परेश ठाकूर यांना शुभेच्छा देण्यासाठी शेकापचे ज्येष्ठ नेते तथा माजी आ. बाळाराम पाटील, माजी आ. मनोहर भोईर, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर, जिल्हा परिषद सदस्य अविनाश ठाकूर, माजी पंचायत समिती सभापती नितीन कोळी, शेकापचे नरेश घरत, माजी उपसभापती रमाकांत पाटील, शेकाप तालुका चिटणीस रवी घरत, शेकापचे सहचिटणीस सुरेश पाटील, जिल्हा चिटणीस सदस्य संजय गावंड, शिवसेना तालुका प्रमुख संतोष ठाकूर, उपतालुकाप्रमुख बी.एन. डाकी, नगरसेविका निहादा ठाकूर, लता पाटील, शेखर पाटील, शुभांगी पाटील, तुळशीदास पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी जल्लोष करत मोठ्या उत्साहात उरण शहरात मिरवणूक काढण्यात आली होती.

## ...सिलिंडरसाठी रांगा

नवीन पनवेल येथील गॅस वितरक कार्यालयाबाहेर पहाटेपासूनच ग्राहकांची मोठी गर्दी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. अनेक नागरिक आपले रिकामे गॅस सिलिंडर घेऊन कार्यालयाबाहेर रांगेत उभे राहून सिलिंडर कधी मिळणार याची वाट पाहात होते. काही ठिकाणी तर रांगा इतक्या लांब वाढल्या की रस्त्याच्या कडेला सिलिंडरची ओळच लागल्याचे दृश्य दिसून आले. सिलिंडर मिळवण्यासाठी महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेक जण तासन्तास उन्हात उभे असल्याचे दिसून आले. वाढत्या मागणीमुळे आणि अपुऱ्या पुरवठ्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असून गॅस मिळेल की नाही याबाबतही अनिश्चितता निर्माण झाली आहे. दरम्यान, घटनास्थळी परिस्थितीचे छायाचित्रण करण्यासाठी गेलेल्या माध्यम प्रतिनिधींना काही ग्राहक तसेच काही कर्मचाऱ्यांकडून अडविण्याचा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. फोटो काढू नका असे सांगत माध्यमांना रोखण्याचा प्रयत्न करण्यात आल्याने याबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. गॅस वितरणाबाबत स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेकांनी प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन गॅस पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे. दरम्यान, वाढती मागणी आणि पुरवठ्यातील अडचणी यामुळे गॅस वितरणावर ताण निर्माण झाल्याचे संबंधितांकडून सांगण्यात येत असून, परिस्थिती लवकरच सुरळीत करण्याचे आश्वासनही देण्यात येत आहे.

## मिनिडोअर संघटनेच्या लढ्याला यश

डिव्हाइस बसवण्यात आले होते, त्या बऱ्याच कंपन्या बंद झाल्यामुळे चालकांना पुन्हा एकदा १२ ते १४ हजार रुपये भुर्दंड सोसावा लागणार होता. याविषयी सखोल चर्चा करून ही जबाबदारी परिवहन विभागाची आहे, असे परिवहन मंत्र्यांनी मान्य करून यासंदर्भात सखोल चौकशी करून जेणेकरून टॅक्सी चालकांना नव्याने डिव्हाइस बसवण्याची गरज लागू नये, डिव्हाईस पुन्हा ॲक्टिव्हेट करून त्यांची वाहने पासिंग करून देण्यात यावी, डिव्हाइस ॲक्टिव्हेट करण्यासाठी नऊ हजार रुपये शुल्क आकारण्यात येत होते. त्यातही कमीत कमी शुल्क आकारून ते डिव्हाइस रिचार्ज कसे करता येईल, यासंदर्भात राज्य परिवहन विभागाला कडक निर्देश या बैठकीत देण्यात आले. माणगाव येथे नव्याने पासिंग टॅक उभारणीचे काम लवकरच पूर्ण होईल, अशी ग्वाहीदेखील देण्यात आली. ज्या विक्रम मिनीडोर टॅक्सींची वयोमर्यादा संपुष्टात आली आहे, अशी वाहने स्क्रॅप केल्यानंतर बदली वाहन लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याच्या सूचनादेखील देण्यात आल्या. या बैठकीमध्ये परिवहन आयुक्त, रायगडचे जिल्हाधिकारी, पनवेल व पेणमधील प्रादेशिक परिवहन अधिकारी, रायगड जिल्हा विक्रम मिनीडोअर चालक-मालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विजयभाऊ पाटील, कार्याध्यक्ष प्रमोद पाटील, उपाध्यक्ष दीपक म्हात्रे, उपाध्यक्ष सुधाकर यादव, सचिव विकास पारंगे, सहसचिव राजू भंडारी, खजिनदार शशिकांत पाटील, महाड ता. अध्यक्ष शेखर राखाडे, महेंद्र मनवे व इतर जिल्हा प्रतिनिधी उपस्थित होते.



### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे पालव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनांच्या मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| पालव ता. अलिबाग | ७/३/क | जिरायत ०-३७-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकुण ०-३७-०० | १.४१ |

**वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती पैकी विक्रेता महेश रविंद्र पाटील यांचे नावे असलेले ०-२०-१० हे. आर. क्षेत्र सदर नोटीसीचा विषय आहे.**

सदर नोटीसीचा विषय असलेल्या मिळकती या विद्यमान मालक महेश रविंद्र पाटील, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक - ११/०३/२०२५
मोबा. नं. ९९२२७०७०१२

अ‍ॅड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
लक्ष्मी नारायण, १ ला मजला,
शॉप नं. ७ व ८, ब्राम्हण आळी,
राम मंदिर समोर ता. अलिबाग,
जि. रायगड ४०२२०१

### जाहीर सूचना

सार्वजनिकरित्या असे सूचित करण्यात येते की, आमचे अशील श्री. अचल बाळकृष्ण म्हात्रे, श्री. अतिश बाळकृष्ण म्हात्रे, श्रीमती लिला बाळकृष्ण म्हात्रे आणि सौ. अर्चना प्रविण पाटील यांनी संयुक्तपणे दि. ४.९.२०१५ राजी **"मेसर्स आकाश डेव्हलपर्स"** यांच्याशी, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मालमत्तेवर ("सदर मालमत्ता") बांधकाम विकास करण्यासाठी कायदेशीर करार ("सदर करार") केला होता. सदर कराराचे पालन न झाल्यामुळे, आमच्या अशीलांनी सदर करार समाप्त, अमान्य, बरखास्त आणि रद्दबातल केला आहे.

उपरोक्त बाबीच्या अनुषंगाने, जनसामान्यांस कळविण्यात येते की, आमच्या अशीलांनी सदर मालमत्तेच्या बांधकाम विकासाकरिता करारबद्ध केलेल्या सर्व कायदेशीर क्षमता व अधिकार समाप्त, अमान्य, बरखास्त व रद्दबातल झाले आहेत. तसेच **आकाश डेव्हलपर्सच्या** भागीदार/प्रतिनिधींशी व्यवहार करणारे कोणीही, आणि / किंवा त्यांच्याकडून, त्यांच्या माध्यमातून किंवा त्यांच्या अधिपत्याखाली दावा करणारे कोणीही, आणि/किंवा त्यांच्यासोबत कोणताही करार, दस्तावेज, कागदपत्रे इत्यादींमध्ये सामील होणारे कोणीही, आणि/किंवा सदर मालमत्तेच्या आणि/किंवा त्यातील कोणत्याही भागाच्या संदर्भात **आकाश डेव्हलपर्सशी** आर्थिक व्यवहार करणारा/करणारी/करणारे, तो व्यवहार, त्याच्या/तिच्या/त्यांच्या स्वतःच्या जबाबदारीवर करतील. यासंदर्भात उद्धवणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या खर्चाचे किंवा परिणामांचे उत्तरदायित्व किंवा बांधिलकी आमच्या अशीलांवर असणार नाही. सदर मालमत्तेच्या विकास हक्कांच्या समाप्ती आणि रद्दीकरणाच्या अनुषंगाने किंवा अन्यथा केलेल्या सर्व किंवा अशा कोणत्याही कृती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

पुढे स्पष्ट करण्यात येते की, आकाश डेव्हलपर्स यांना, त्यांच्याद्वारे आणि / किंवा त्यांच्या कोणत्याही भागीदारांद्वारे, त्यांच्या माध्यमातून किंवा त्यांच्या अधिपत्याखाली, आमच्या अशीलांचे प्रतिनिधित्व करण्याचा किंवा आमच्या अशिलांच्यावतीने, कोणत्याही पक्ष/व्यक्ती/संस्था/सरकारी अधिकाऱ्यांना सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणतेही दस्तावेज किंवा कागदपत्रे सादर करण्याचा अधिकार नाही.

जाहीर सूचना प्रकाशित झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला आक्षेप नमूद पत्त्यावर नोंदवणे बंधनकारक आहे.

**वर उल्लेख केलेल्या परिशिष्ट** (सदर मालमत्तेचे विवरण)
सर्वेक्षण क्रमांक 131/अ, H. No. 2 द्वारे प्रमाणित ३०७.६० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जागेवरील सर्व भूखंड आणि स्थावर मालमत्ता, पोयनाड गाव येथे, तालुका-अलिबाग, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र.
दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी
Sd /-
**मेसर्स ऱ्हाय ज्युरीस लॉ असोसिएट्स**
वकील,
ऑफिस नं. ६३, राजगीर चेंबर्स, ७ वा मजला, ओल्ड कस्टम हाऊस समोर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
भ्रमणध्वनी : ९००४९१४४७०/७९००१५६०४२
ईमेल : rhyjurislaw.associates@gmail.com

### MAHAGENCO — Maharashtra State Power Generation Co. Ltd.

## E-TENDER NOTICE (REFLOAT)

**Tender Specification No.** Civil-III / KGSC Pophali / Rfx No. 3000066812, 3000066815 / FY-2025-26.
**Name of work:**
1) Construction of security Chaukies at various locations in Powerhouse premise at KGSC, Pophali.
2) Providing wooden badminton court with mat at recreation club building, KGSC, Pophali.

**Sale period :-** 12.03.2026 at 11:00 Hrs. to 26.03.2026 up to17:00 Hrs. | **Submission Date :-** 27.03.2026 up to17:00 Hrs.

Kindly see the company's website https://eprocurement.mahagenco.in. For detailed tender notice.

**Contact person-** Executive Engineer (c), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai **Fax :**( 022)26581469 **Tel. No.** 022-26474211 extn. 2590, 26472131

### MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|---|
| 1 | Tender-12 (Rfx No. 7000039199) | Hiring of vehicle at 220kV Taloja Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027. | Rs. 5,81,455/- |
| 2 | Tender-13 (Rfx No. 7000039254) | Hiring of vehicle at 220kV Wadkhal Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027. | Rs. 5,81,455/- |
| 3 | Tender- 14 (Rfx No. 7000039219) | Hiring of LMV vehicle at 220kV Ulwe GIS Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | Rs. 5,81,455/- |
| 4 | Tender- 15 (Rfx No. 7000039220) | Hiring of vehicle at 220kV Timber market GIS Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027. | Rs. 5,81,455/- |
| 5 | Tender- 16 (Rfx No. 7000039255) | Hiring of LMV vehicle for EHV lines Sub-Division Panvel-1 under EHV (O&M) Division Panvel for 01.04.2026 to 31.03.2027 | Rs. 5,80,213/- |
| 6 | Tender- 17 (Rfx No. 7000039256) | Hiring of LMV vehicle for EHV lines Sub-Division Panvel-2 under EHV (O&M) Division Panvel from 01.04.2026 to 31.03.2027 | Rs. 5,80,213/- |
| 7 | Tender- 18 (Rfx No. 7000039224) | Hiring of vehicle of LMV for the office of EHV S/S Maint. S/Dn. Apta under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027. | Rs. 5,71,961/- |
| 8 | Tender- 19 (Rfx No. 7000039257) | Hiring of MMV vehicle Mahindra Pickup diesel vehicle with skilled driver for EHV Lines Maint. Sub-Division Panvel-1 under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | Rs. 5,99,207/- |
| 9 | Tender- 20 (Rfx No. 7000039258) | Hiring of MMV vehicle Mahindra Pickup diesel vehicle with skilled driver for EHV Lines Maint. Sub-Division Panvel-2 under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | Rs. 5,99,207/- |
| 10 | Tender- 21 (Rfx No. 7000039225) | Hiring of vehicle of MMV for the office of EHV S/S Maint. S/Dn. Apta under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | Rs. 5,99,207 |

**EMD 1% of estimated cost for each Tender. Tender fees :- 500 + GST**
**Submission of bids from 11.03.2026 @ 18:00 Hrs. to 26.03.2026 up to 23:59 Hrs,**
**Opening date:- 27.03.2026 @ 11:00 Hrs.**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :- The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505**
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

### MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender.

**Specification**

**Tender No.:** E-Tender - 01/2026-27
**Name of Tender:** E- Tender for hiring of one no. of light motor vehicle (LMV) for the office of the Executive Engineer, Major Stores, Panvel for the FY 2026-27. **Tender Fee:** Rs. 500 /- + applicable GST
**RFx No.: 7000039261**

**Online Downloading the RFx:**
Dt.12.03.2026, 00:00 Hrs. to 26.03.2026, 23:59 Hrs.
**Online Submission of the RFx:**
On or Before Dt. 26.03.2026, 23:59 Hrs.
**Online Opening of the Techno Commercial RFx:**
Dt. 27.03.2026, at 10:00 Hrs. (If possible ).
**Online Opening of the Price bid:**
Dt. 27.03.2026 at 12:00 Hrs. (If possible)

For further details visit our website: **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** The Executive Engineer, Mobile No. 8275215120
**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**Sd/-**
**Executive Engineer**
**Major Stores, Panvel**

### MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend 28 / 25-26 RFX 7000039238 | Supply and installation of Split ACs at 220kV Uran / Timbermart / Panchanand and 100kV Taloja S/stn. under EHV (O&M) Circle, Panvel. | Rs. 36.73 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee : Rs. 500/- + GST. Submission of bids from 10.03.2026 to 25.03.2026 up to 11:00 hrs, Opening date:- 25.03.2026 @ 11:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person:** The Executive Engineer(Adm) Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

### MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|---|
| 1 | Tender-2 (Rfx 7000039240) | Hiring of vehicle at EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027. | 5,80,213/- |
| 2 | Tender-3 (Rfx 7000039211) | Hiring of vehicle at 220kV Uran Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | 5,81,455/- |
| 3 | Tender-4 (Rfx 7000039212) | Hiring of vehicle at 220kV Tambati Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | 5,81,455/- |
| 4 | Tender-5 (Rfx 7000039214) | Hiring of vehicle at 220kV ONGC Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | 5,81,455/- |
| 5 | Tender-6 (Rfx 7000039221) | Hiring of vehicle at 220kV Apta Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | 5,81,455/- |
| 6 | Tender-7 (Rfx 7000039213) | Hiring of vehicle at 100kV Taloja Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | 5,81,455/- |
| 7 | Tender-8 (Rfx 7000039216) | Hiring of vehicle at 100kV Thal Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | 5,81,455/- |
| 8 | Tender-9 (Rfx 7000039217) | Hiring of vehicle at 100kV Khopoli Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | 5,81,455/- |
| 9 | Tender-10 (Rfx 7000039222) | Hiring of vehicle at 100kV Patalganga & Bhokarpada Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | 5,81,455/- |
| 10 | Tender-11 (Rfx 7000039218) | Hiring of vehicle at 100kV Jite Substation under EHV (O&M) Division Panvel for period 01.04.2026 to 31.03.2027 | 5,81,455/- |

**EMD 1% of estimated cost for each Tender. Tender fees :- 500 + GST**
**Submission of bids from 10.03.2026 @ 18:00 Hrs. to 25.03.2026 up to 23:59 Hrs,**
**Opening date:- 26.03.2026 @ 11:00 Hrs.**
For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :- The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505**
**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

# पोशीर धरणाला स्थानिकांचा विरोध

## धरण हटवा, शेतकरी वाचवा मोहीम; तहसील कार्यालयावर मूक मोर्चा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील पोश्री नदीवर बांधण्यात येणाऱ्या पोशीर धरणाला स्थानिकांनी विरोध केला आहे. धरण होणार असलेल्या भागातील शेतकऱ्यांनी ही धरण होऊ नये यासाठी १७ मार्च रोजी मूक मोर्चाचे आयोजन केले आहे. बोरगाव शेतकरी मंडळ धरण हटाव समितीच्या वतीने हे आंदोलन केले जाणार असून कर्जत तहसील कार्यालयावर हा मोर्चा निघणार आहे.



कर्जत तालुक्यातील प्रस्तावित पोशीर प्रकल्पाचा वाद आता पेटला आहे. धरणाला शेतकऱ्यांचा वाढता विरोध लक्षात घेता हा प्रश्न चिघळण्याची चिन्हे आता दिसत आहेत. या प्रकल्पामुळे स्थानिक शेतकरी कायमचा भूमिहीन होणार असल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी शेतकरी मंडळ बोरगांव परिसर धरण हटाव समितीच्या नेतृत्वाखाली विरोध सुरू केला आहे. या शेतकरी आक्रमक झाले असून धरणाला कडाडून विरोध करण्यासाठी कर्जत प्रांत कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पोशीर धरण प्रकल्पाच्या हालचालींना प्रशासकीय पातळीवर वेग आला असला, तरी स्थानिक पातळीवर मात्र विरोधाची धार तीव्र झाली आहे. या प्रकल्पामुळे बोरगांव, कुरुंग, उंबरखांड, भवानीपाडा, बोन्डेशेत, पेंढरी, भोपळे वाडी हे गावे बाधित होणार असून चई, चेवणे, चाफेवाडी, बलीवरे, खांडस गावांचा भाग पाण्याने भरणार आहे.

या भागातील शेतकरी अनेक पिढ्या शेतीवर अवलंबून असलेला शेतकरी देशोधडीला लागेल, अशी भावना ग्रामस्थांमध्ये आहे. या गावांमधील सुपीक जमीन धरणाखाली जाणार असल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, या आंदोलनात गावा-गावातील नवतरुण वर्ग मोठ्या संख्येने सामील होणार आहेत. येथील तरुणांनी गावोगावी जाऊन प्रकल्पाचे दुष्परिणाम सांगत जनजागृती सुरू केली आहे.

धरण हटवा, शेतकरी वाचवाफ अशी मोहीम सध्या जोरदारपणे राबवली जात असून गावोगावी बैठका घेतल्या जात आहे. या प्रकल्पाचा लढा उभारण्यासाठी स्थानिक शेतकरी मंडळ बोरगांव परिसर पोशीर धरण हटाव समिती स्थापन करण्यात आली असून मोर्चाच्या पार्श्वभूमीवर समितीच्या वतीने कर्जतचे उपविभागीय अधिकारी (प्रांत) तहसीलदार आणि पोलीस प्रशासनाला अधिकृत निवेदन देण्यात आले आहे. तसेच तालुक्यातील सर्व सामाजिक संघटना, शेतकरी संघटना व सर्व राजकीय नेत्यांनाही या आंदोलनाची माहिती देऊन पाठिंबा देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.


### मोर्चाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष

१७ मार्चला होणाऱ्या या मोर्चाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. प्रशासन यावर काय भूमिका घेणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. हा प्रकल्प स्थानिक शेतकऱ्यांच्या मुळावर उठणारा आहे. हा प्रकल्प रद्द होईपर्यंत आमचा लढा सुरूच राहील असे शेतकऱ्यांच्या वतीने पोशीर धरण हटाव समितीचे अध्यक्ष तानाजी चौधरी व स्थानिक शेतकरी मंडळ बोरगांव परिसर यांचेतर्फे जाहीर करण्यात आले आहे.

# १३ लाखांची फसवणूक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

वेगवेगळ्या कारणांसाठी ट्रेडिंगकरिता पैसे स्वीकारून १३ लाख ३० हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.पनवेलमध्ये राहणाऱ्या मेधा शहासने यांनी फेसबुकवर गुंतवणुकीसंदर्भात जाहिरात पाहिली. आणि लिंकवर क्लिक करून माहिती भरली त्यानंतर फॉरेस्ट ट्रेडिंग कंपनीत लॉगिन करून ट्रेडिंग कसे करायचे, याबाबत माहिती घेतली. गुंतवणूक केल्यावर नुकसान झाल्याचे सांगून आणखी पैसे पाठवण्यास सांगण्यात आले. त्यांनी १३ लाख ३० हजार रुपये ऑनलाइन आणि आरटीजीएसद्वारे पाठवले. त्यानंतर युद्धजन्य परिस्थितीमुळे नुकसान झाल्याचे सांगून आणखी आठ लाख रुपये गुंतवल्यास २२ लाख रुपये मिळतील, असे सांगितले. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.



● मुरूड शहर हिरवाईने नटलेले आहे. नारळी पोफळीच्या बागा बहरल्या असून स्वच्छ मुरूडचे चित्र डोंगरी टेकडीवरून टिपले आहे.
(छायाचित्र : सुधीर नाझरे)

# विधी महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचेफ औचित्य साधून, अलिबाग येथील जनता शिक्षण मंडळाच्या अ‍ॅड. दत्ता पाटील कॉलेज ऑफ लॉ येथे विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी विशेष वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जेएसएम महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. प्रविण गायकवाड यांनी स्त्री ही एक व्यक्ती आहे, असे प्रतिपादन करत स्त्री-पुरुष समानता केवळ कायद्यात न राहता ती समाजाच्या मानसिकतेत बिंबविणे गरजेचे असल्याचे आवाहन केले.



या स्पर्धेत प्रथमेश पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला, तर आर्या पाटील आणि नेहा पाटील यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. यशस्वी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. प्रा. डॉ. संदीप घाडगे यांनी स्त्री-पुरुषांनी एकमेकांना सहकार्य करत विकास साधणे गरजेचे असल्याचे सांगितले. जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. गौतम पाटील आणि विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. नीलम हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वी झाला. कार्यक्रमाचे नियोजन प्रा. पियुषा पाटील यांनी केले. यावेळी प्रा. कौशिक बोडस, प्रा. सुरज पुरी यांच्यासह, आर्य पाटील, महाविद्यालयातील विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुद्देमाल लंपास

**पनवेल :** कळंबोली येथील सेक्टर १६ मधील पृथ्वी या इमारतीतील बंद घर फोडून चोरांनी अवघ्या दीड तासांत तब्बल १३ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल लंपास केला. ही घटना घडली असून या प्रकरणी कळंबोली पोलिसांनी चोरीचा गुन्हा नोंदवला आहे. कळंबोली उपनगरातील सेक्टर १६ येथील पृथ्वी या इमारतीमध्ये राहणाऱ्या ४९ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीत त्यांच्या बंद घराचे लॅच तोडून शयनकक्षातील लोखंडी कपाटात ठेवलेल्या सोन्या-चांदीचे दागिन्यांवर तसेच रोखरकमेवर डल्ला मारला आहे. या घटनेबाबत संबंधित महिलेने कळंबोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

# वारे शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या वर्षीप मुंबई व श्री साई ट्रस्ट नवी मुंबई यांच्याकडून वारे येथील जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य तसेच पायात घालण्यासाठी चपला भेट देण्यात आली. ट्रू वर्षीप मुंबई व श्री साई ट्रस्ट नवी मुंबई यांच्या सहकार्याने वाटप करण्यात आले. त्यावेळी श्री साई ट्रस्टचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी ट्रू वर्शिप संस्थेच्या जेठवाणी, सुचित्रा, संजय तसेच श्री साई ट्रस्टच्या संचालक राधिका घुले आणि दिलीप घुले तसेच वारे शाळेचे मुख्याध्यापक प्रदिप सैंदाणे, आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यानंतर वारे गावातील कुरकुल वाडीत जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

# पशुसंवर्धन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

महा एनजीओ. फेडरेशन, इंडियन ऑइल व अदानी व्हेंचर्स यांच्या संयुक्त विद्यमाने, तसेच महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या सहकार्याने उरण तालुक्यातील पशुपालकांसाठी पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण व कृतीसत्र शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबीर शुक्रवार, (दि.१३) मार्च रोजी सकाळी ९:०० ते दुपारी २:०० या वेळेत माऊली मंगल कार्यालय, भोईरवाडी (म्हातवली-नागाव रोड) येथे संपन्न होईल.

पशुसंवर्धन शिबिराचे उद्घाटन महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

याप्रसंगी डॉ. प्रवीण कुमार देवरे, अविनाश ठाकूर, डॉ. मनिष पाटीलप्रेरणा पाटील, रीना घरत, प्रियांका मढवी, निर्मला घरत, दीपक भोईर, परेश ठाकूर, प्रारंभी गावंड , कविता पाटील, कैलास भोईर, महेश म्हात्रे यांची उपस्थिती लाभणार आहे.

शिबिरात पशुपालकांना तज्ज्ञ पशुवैद्यकांकडून विविध मोफत सेवा व मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. या शिबिरात जनावरांची गर्भ तपासणी, वंध्यत्व तपासणी व उपचार, गाई-म्हशींसाठी लाळ्या खुरकुत लसीकरण, शेळी-मेंढीसाठी लसीकरण, कोंबड्यांसाठी मानमोडी लसीकरण करण्यात येईल. श्वानांसाठी अँटीरेबीज लसीकरण व जंत निर्मूलन सुविधाही या शिबिरात उपलब्ध असणार आहे.

## कारचा अपहार

**पनवेल :** वापरण्यास दिलेली कार परत न करता अपहार केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात साजिद इकबाल शेख (रा. सीवूड) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. फिरोज पठाण हे टपाल नाका, पनवेल येथे राहत असून त्यांनी एमजी हेक्टर कार खरेदी केली होती. त्यासाठी बँकेचे कर्ज घेतले होते. कारचे हप्ते भरणे अवघड झाल्याचे सांगितले असता साजिद शेखने कार वापरण्यासाठी घेतो आणि कर्जाचे हप्ते भरतो, असे सांगून कार नेली. कार घेतल्यानंतर साजिदने तीन ते चार महिन्यांचे कर्जाचे हप्त्याचे रक्कम पाठवली. मात्र त्यानंतर हप्ते देणे बंद केले. पठाण यांनी शेखची चौकशी केला असता तो सीवूड येथील घर सोडून पुण्याला गेल्याचे समजले.

# फणसाड-सुपेगाव रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुड-रोहा प्रवासात जवळचा मार्ग असलेल्या फणसाड-सुपेगांव मार्गावर आदिवासी वाडी सुमरादेवी ते सुपेगावच्या पुढील अवघड वळणापर्यंत अनेकठिकाणी खड्डेपडले आहेत. याकडे संबंधित बांधकाम खात्याचे दुर्लक्ष असल्याबाबत नाराजी व्यक्त होत असून तातडीने रस्ता दुरुस्ती डांबरीकरण न झाल्यास उसरोली पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या सहकार्याने आंदोलन करण्यात येईल. असा इशारा अविनाश शिंदे यांनी दिला आहे.



गेले कित्येक वर्षे सुपेगाव मार्गावर रस्ता न बनविल्याने अद्याप खड्ड्यातच आहे. मुरुड-जंजिरा पर्यटनात रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर अन्य ठिकाणाहून काशिद-बिच, फणसाड अभयारण्य, मुरुड-जंजिरा किल्ला पाहाण्यासाठी रोहा सुपेगांवमार्गे मुरुड रस्ता जवळचा असल्याने या रस्त्यावर वाहनांची वाढती वर्दळ असते, या पंचक्रोशीतील अनेकांना आपल्या रोजीरोटीसाठी टू व्हीलरवरून दररोज प्रवास करावा लागतो. गेले कित्येक वर्षापासून या रस्त्यावर बऱ्याच ठिकाणी खड्ड्याचे साम्राज्य असून वाहन चालकांना आपली वाहने चालवताना कसरत करावी लागते आहे. शासनाच्या संबंधित बांधकाम विभागाने यात लक्ष पुरवून सुपेगांव मार्गावर रस्त्यावर दुरुस्ती डांबरीकरण न झाल्यास नाईलाजास्तव पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असा इशारा अविनाश शिंदे यांनी दिला असून याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील असे म्हटले आहे.

## पाळीव प्राण्यांचा जातोय बळी | वनविभागाकडे जेरबंद करण्याची मागणी

# जावेळे गावात बिबट्याचा थरार

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील जावेळे गावात गेल्या काही दिवसांपासून हिंस्त्र श्वापद बिबट्याचा वावर वाढल्याने संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरले आहे. विशेषतः बिबट्याच्या हल्ल्यांमुळे पाळीव जनावरांचा बळी जात असल्याने शेतकरी आणि पशुपालक मोठ्या चिंतेत सापडले आहेत. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये घबराट पसरली असून संध्याकाळनंतर गावात शांतता पसरलेली दिसून येत आहे. नागरिकांनी अनावश्यकपणे



घराबाहेर पडणे टाळण्यास सुरुवात केली असून लहान मुलांनाही बाहेर खेळण्यासाठी पाठवले जात नाही.

या संदर्भात जावेळे येथील शेतकरी विजय रांगले यांनी श्रीवर्धन वनक्षेत्रपाल अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. वनविभागाने या गंभीर प्रकाराची दखल घेऊन ग्रामस्थांच्या जीवित आणि मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी तात्काळ पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, (दि.८) मार्च रोजी विजय रांगले यांनी आपली १२ गुरे नेहमीप्रमाणे जंगल परिसरात चरण्यासाठी सोडली होती. मात्र संध्याकाळच्या सुमारास त्यापैकी दोन गुरांवर बिबट्याने हल्ला करून त्यांना जागीच ठार केले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. रांगले यांनी दिलेल्या माहितीनुसार, केवळ त्यांच्या गुरांनाच नव्हे तर गावातील इतर शेतकऱ्यांची मिळून आतापर्यंत गावांमधील सुमारे ६ गुरे या बिबट्याने ठार केली आहेत.

ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, बिबट्याचा वावर आता केवळ जंगलापुरता मर्यादित राहिलेला नसून तो लोकवस्तीकडे सरकत आहे. परिसरातील काही भागात बिबट्याने ५ पाळीव कुत्र्यांवरही हल्ला करून त्यांना ठार केले आहे. या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीती अधिकच वाढली आहे. रात्रीच्या वेळी काही ग्रामस्थांना हा प्राणी प्रत्यक्ष दिसल्याचेही सांगण्यात येत आहे.

जावेळे परिसरातील अनेक नागरिकांचा मुख्य व्यवसाय शेती आणि पशुपालन आहे. गुरेढोरे हीच त्यांची उपजीविकेची साधने असल्याने या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. काही शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांना रात्री बाहेर न ठेवता सुरक्षित गोठ्यांमध्ये ठेवण्यास सुरुवात केली आहे. तरीही जंगलालगतच्या भागात असलेल्या घरांना धोका कायम असल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

### वनविभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न

वनविभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याची चर्चा गावात सुरू आहे. जावेळे परिसरात अनेक ठिकाणी बिबट्याच्या पाऊलखुणा स्पष्टपणे दिसून येत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. वाढत्या घटनांमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी व पशुपालकांचे मोठे नुकसान होत आहे. त्यामुळे या गंभीर परिस्थितीवर वनविभाग नेमकी कोणती पावले उचलतो, याकडे जावेळे गावासह संपूर्ण श्रीवर्धन तालुक्याचे लक्ष लागले आहे

गावात सध्या प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## निवडक

● (छायाचित्र : संजय गायकवाड)



### कर्करोगासाठी अत्याधुनिक निदान चाचणी

**कर्जत :** महानगर गैस, आयुजेन बायो सायन्स पुणे आणि अभिनव ज्ञान मंदिर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अभिनव ज्ञान कनिष्ठ महाविद्यालय इमारतीत गर्भाशय मुखाच्या कर्करोगासाठी अत्याधुनिक निदान चाचणी सर्व महिला शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मोफत उपलब्ध करुन देण्यात आली. गर्भाशय मुखाचा कर्करोग हा महिलांमध्ये आढळणाऱ्या कर्करोगांपैकी सर्वाधिक प्रमाण असलेला कर्करोगाचा प्रकार आहे. हा कर्करोग ह्युमिलो पपिल्लोमा या विषाणूमुळे होतो. यावेळी अन्न व औषध प्रशासन आणि जागतिक आरोग्य संघटना ने शिफारस केलेली मोफत तपासणी ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली. बायोजेन संस्थेचे अभय वैद्य, व त्यांचे सहकारी प्राची इंगोले यांनी प्रथम गर्भाशय मुखाच्या कर्करोगाविषयी माहिती, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि या विषाणूची चाचणी याची विस्तृत माहिती चित्र फिती द्वारे सादरीकरण केले. त्याद्वारे महिला भगिनींच्या मनातील भीती, अनेक शंकांचे निरसन केले. डॉ. शर्वाणी कुळकर्णी यांनी स्वतः चाचणी करून घेऊन उपस्थित महिलांना कसलीही भिती न बाळगता या मोफत सुविधेचा लाभ घ्यावा असे सूचित केले. अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय,वरिष्ठ महाविद्यालय,शारदा मंदिर, शिशु मंदिरमधील बहुतांश महिलांनी ही चाचणी केली,याचा लाभ घेतला. कार्यक्रमास अभिनव ज्ञान मंदिर संस्था सचिव नंदकुमार मणेर, विलास शिंदे, अंकिता दाभाडे, अंजली किसवे, विजय मोरे आणि बहुसंख्य महिला कर्मचारी या उपस्थित होते.




### नवनाथ ठाकूर यांचा प्रामाणिकपणा

**उरण :** आजच्या काळात दुसऱ्याची वस्तू मिळाली की स्वतः कडे ठेवण्याची प्रवृत्ती वाढत चालली असताना, उरण तालुक्यातील बांधपाडा(खोपटे) येथील सामाजिक कार्यकर्ते नवनाथ नारायण ठाकूर यांनी प्रामाणिकपणाचा आदर्श घालून दिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ट्रान्स इंडिया कंपनीसमोर तब्बल १७ तोळ्यांचा सोन्याचा गंठण आणि रोख रक्कम नवनाथ ठाकूर यांना सापडली. मात्र, या मौल्यवान वस्तूवर डोळा न ठेवता त्यांनी एक रुपयाचीही अपेक्षा न करता ती वस्तू राजू शांताराम पाटील उर्फ राजू टेलर यांच्या पत्नीला (कोप्रोली) यांना प्रामाणिकपणे परत केली. आजच्या स्वार्थी युगात एवढ्या मोठ्या किमतीची वस्तू परत करणे म्हणजे खरोखरच मोठे धाडस आणि प्रामाणिकपणाचे उदाहरण असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहे. नवनाथ ठाकूर यांनी दाखवलेल्या या प्रामाणिकपणामुळे परिसरात त्यांचे कौतुक होत आहे. समाजात अजूनही सच्चेपणा आणि प्रामाणिकपणा जिवंत आहे, हे नवनाथ यांच्या कृतीतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. त्यांच्या या अभिमानास्पद कार्याबद्दल परिसरातून त्यांचे मनापासून अभिनंदन करण्यात येत असून त्यांनी असेच सामाजिक कार्य करत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### रणरणत्या उन्हात रानमेव्याची भुरळ

**पाताळगंगा :** उन्हाळ्याचे आगमन होताच रानातील रानमेवा करवंदे, कैरी, काजू, चिंच, आदी बाजारात दाखल झाले आहे. या रानमेव्यामुळे आदिवासी या समाज्याला रोजगार मिळत असतो. हिरवी गार करवंदांचा ठेचा म्हणून स्वयंपाक करण्यासाठी उपयोग होत आहे. रुचकर, स्वस्त आणि औषधी असे बहुउपयोगी असलेल्या या रानमेव्याची अनेकांनी भुरळ पडत आहे. दुर्गम भागात राहणारे अदिवासीं बांधवांचे उत्पन्नाचे साधन म्हणून



डोंगरातील रानमेवा असून उन्हाळ्याच्या दिवसामध्ये पटकन तोंडात टाकता येणारा तसेच शरीराला आणि मनाला गारवा देणाऱ्या या रानमेव्याला अधिक मागणी दिसत आहे. तसेच उन्हाळ्याच्या दिवसामध्ये शरीराला थंडावा निर्माण होण्यासाठी बाजारपेठेमध्ये आंबा, फणस, यासारख्या फळांचा बरोबरच करवंद, काजुफळ, तोरणे, यासारख्या रानमेव्याची विक्री मोठ्या विक्री काही दिवसात होणार आहे, त्यामुळे आदिवासा महिलांना रोजगार उपलब्ध होणार आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● **नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, किचन हेल्पर लेडीज, कॉन्टिनेंटल कुक, ब्रेकफास्ट कुक,मेन्टेनन्स पर्सन, वेटर,हाऊसकीपर, हाऊसकिपिंग सुपरवायझर,रिसॉर्ट मॅनेजर (क्वालिटी कंट्रोल), इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२

● **बांधकाम साहित्य विक्री दुकानात अकाऊंटस** टॅलीचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. किमान २/३ वर्षाचा अनुभव संपर्क- ८८०६६८३२३२, ८००७८९३२३२

● **अलिबाग-कुरूळ येथे ८.२८ गुंठे एन.ए. प्लॉट** विकणे आहे. संपर्क : ९६२३८४९३४९

● **ओम साई टेक्निशियन** इलेक्ट्रिक, वेल्डर, फ्रिज व एसी टेक्निशियन पाहिजे. संपर्क : ७०६६१३८३६८

● **घरकामासाठी** बाई पाहिजे. ७३७८४८०१५१

● **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२३ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग मो. ८७७९८०५३५३

● **सुवर्णसंधी** ( WORK FROM HOME) : वाढत्या महागाईमध्ये एक्स्ट्रा इन्कम कसे घेऊ शकतो? घरबसल्या कामाची सुवर्णसंधी नोकरदार गृहिणी विद्यार्थि इतर सर्वांसाठी घरातून मोबाईल वरून किंवा ऑफिसमधून काम करा. Monthly Income १२००० १५०००, Age १८+, Contact Numbe - ८४२१३९६२३३

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# मुंढ्याची वाडीत हरिनाम सप्ताह

। तळा । प्रतिनिधी ।

तळा शहरातील मुंढ्याची वाडी येथे गुरुवारी (दि.५) ते मंगळवारी (दि.१०) या कालावधीत आयोजित करण्यात आलेला अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात पार पडला.

मुंढ्याची वाडी येथील शिवराम घरटकर व रामचंद्र गोरीवले यांच्या मार्गदर्शनाखाली बासष्ठ वर्षांपूर्वी या हरिनाम सप्ताहाची सुरुवात करण्यात आली होती. या दोन्ही व्यक्तींनी १९६४ साली मुंढ्याची वाडी येथे ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिराची स्थापना करून गावात वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी सुरुवात केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा आज बासष्ठ वर्षानंतरही कायम आहे. या अखंड हरिनाम सप्ताहात गावात कोणाच्याही घरी चूल अथवा गॅस पेटत नाही गावातील सर्व नागरिकांचे जेवण हे सप्ताहाच्या ठिकाणीच होते. हरिनाम सप्ताहाच्या काळात संपूर्ण गावात मांसाहार वर्ज्य असते. तसेच सप्ताहाची समाप्ती होइपर्यंत गावामध्ये कोणत्याही प्रकारचे व्यसन केले जात नाही. यामुळे आज गावामध्ये भरभराट होऊन संपूर्ण गाव एकसंघ झाला आहे. यंदा या सप्ताहाचे बासष्ठवे वर्ष असून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी या सप्ताहात कीर्तन, हरिपाठ, कलश स्थापना, वीणा पूजन, ध्वजा रोहण, महाप्रसाद, श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुकांची पालखी मिरवणूक असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमासाठी भाविक तसेच ज्ञानेश्वर माऊली सांप्रदायिक मंडळ, ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ मुंढ्याची वाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर सूचना

सर्व संबंधित व्यक्ती, आणि हितधारकांस सुचित करण्यात येते की, मौजे नागाव, ता. अलिबाग जि. रायगड येथील खाली नमुद केलेल्या जमीन आमचे आशिलाने खरेदी करण्याचे ठरवले आहे. म्हणून, खाली नमूद करण्यात आलेल्या जमिनीबाबत जर कोणत्याही व्यक्तीची, संस्था ट्रस्ट, सहकारी संस्था, कुळधारक, खरेदीदार, गहाणदान, तारणदार, भाडेकरू किंवा इतर कोणालाही काही हरकत, दावा, अडचण, अडथळा किंवा कोणताही कायदेशीर संबंध असेल किंवा सदर मिळकतीबाबत कोणीही खरेदीखत अथवा साठेकरार केला असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत योग्य त्या लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्यावर सादर कराव्यात.

जर दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही, तर सदर जमीन निर्विघ्न आणि निर्विवाद आहे असे मानले जाईल आणि आमचे आशिल त्यानुसार खरेदी व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या आशिलावर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक राहणार नाहीत, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | मौजे. | गट. क्र. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | नागाव | १५०५ | १२.९०.०० | १२९.०० |

अलिबाग
दि. ११/०३/२०२६

सही/-
**ॲड. रोशन रविंद्र पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग रायगड
मोबाईल : ८८३०४५४२१७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. किरण लव कोरगावकर रा. मु.नागाव पो. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड, यांच्या सोबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

तलाठी सजा नागाव व ग्रामपंचायत नागाव हद्दीत मौजे मु.नागाव पो.नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील बिनशेती मिळकतीचे विस्तृत वर्णन खालीलप्रमाणे,

| मौजे | भुमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| नागाव | १६६९ | १४-००-०० | १४०-०० |

(वर नमुद मिळकती पैकी श्री. किरण लव कोरगावकर यांची २-२५-०० आर. चौ. मीटर आकार २२-५० रू.पैसे एवढे क्षेत्र)

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीचे क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक :- ११-०३-२०२६.

**(ॲड.आर.आर.कुलसंगे)**
ॲडव्होकेट

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मकरंद अनंत विपाट व सौ. मानसी मकरंद विपाट, रा. मु.नागाव पो. नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड, यांच्या सोबत व्यवहार ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

तलाठी सजा नागाव व ग्रामपंचायत नागाव हद्दीत मौजे मु.नागाव पो.नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील बिनशेती मिळकतीचे विस्तृत वर्णन खालीलप्रमाणे,

| मौजे | भुमापन क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| नागाव | १६६९ | १४-००-०० | १४०-०० |

(वर नमुद मिळकती पैकी श्री. मकरंद अनंत विपाट, सौ. मानसी मकरंद विपाट यांची २-२५-०० आर. चौ. मीटर आकार २२-५० रू.पैसे एवढे क्षेत्र)

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीचे क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक :- ११-०३-२०२६.

**(ॲड.आर.आर.कुलसंगे)**
ॲडव्होकेट

दि. ११/०३/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरच्या मिळकतीच्या विक्री संबंधीत बोलणी विद्यमान मालक आत्माराम बाळाराम पाटील यांचेसोबत झालेली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर. चौमी.) | आकारणी |
|---|---|---|---|
| शहाबाज ता. अलिबाग | ८०७ | ०-४०-२०<br>पो.ख. ०-००-८०<br>एकुण ०-४१-०० | ५.३७ |

वर वर्णन केलेली मिळकत हि या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ०७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु. पेझारी पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे आगरसुरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन शेतजमिन मिळकती श्री. विजय गणपत म्हात्रे, वगैरे, राहणार आगरसुरे, ता. अलिबाग, यांच्या निर्वेध मालकी हक्काच्या असून, सदर जमिन मिळकती, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदरील जमिन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. विजय गणपत म्हात्रे, वगैरे, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध आहेत, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी, हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतींचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| आगरसुरे ता. अलिबाग. | १०९ | ०-०५-००<br>पो.ख. ०-०१-००<br>एकूण ०-०६-०० | ००-१० |

अलिबाग,
दिनांक ११/०३/२०२६.

सही/-
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड, खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलानी मौजे इंद्रपै, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत व त्या वरील घर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. विकास जयराम वाकडे यांचेकडून नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविलेले आहे. त्या मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार | भूधारणा पद्धत |
|---|---|---|---|---|
| इंद्रपै ता. अलिबाग जि. रायगड | ७१/२ | ३.००.०० | ३०.०० | वर्ग-१ |

या बिनशेती मिळकतीवरील घर क्र. ३५ क्षेत्र ४७.०३ चौ.मी.

सदरहू वर्णन केलेली बिनशेती मिळकत व त्या वरील घर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याची व ती मिळकत कायमस्वरुपी विकण्याचा पुर्ण हक्क व अधिकार असल्याची हमी सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेली आहे. तथापी सदर मिळकतीत अन्य कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र, जाती, शित, कर्जाचा बोजा, जामिनकी, कुळहक्क, कबजा वारसाहक्क, मालकी, एम. ओ. यु. करार, ताबे कब्जा वहीवाटी, रस्ता वहीवाट, कोर्टकचेरी वगैरे संबंधी कसल्याही प्रकारचे हक्क अगर हितसंबंध अगर तक्रार/हरकती असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसाचे मुदतीत लेखी स्वरूपात प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे सादर कराव्यात. तशी लेखी हरकत वा तक्रार दिलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर हितसंबंध अधिकार मिळकतीवर विद्यमान मालकाशिवाय अन्य कोणाचाही कसलाही हक्क, नाही. वा असल्यास तो त्यांनी स्वेच्छेने सोडुन दिला आहे असे समजून, गृहीत धरून सदरचा खरेदीखत नोंदणीकृत करून पूर्ण केला जाईल व या मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : ११/०३/२०२६

सही/-
**ॲड. सचिन सदानंद पाटील**
पत्ता : कुरूळ, ता अलिबाग, जि. रायगड
मो.नं ९८८१६३७९२४/७९७२७७९९०२

## ग्रुप ग्रामपंचायत देगाव
## ता. माणगाव, जि. रायगड
## निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत देगाव खालील कामाकरीता जास्तीत जास्त नोंदणीकृत इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव/वस्तूचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | १% इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रिळे विहिरीला संरक्षक जाळी बसविणे. | ५००००/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५००/- | २००/- |
| २ | पाचोळे पाऊसपाणी संकलन करणे | २००००/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | २००/- | २००/- |
| ३ | रिळे विहिर दुरूस्ती करणे | २४१००/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | २४१/- | २००/- |
| ४ | देगाव बौ. वाडी विहिरीवर संरक्षक जाळी बसविणे. | ४७८८६/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ४७८/- | २००/- |
| ५ | निळगुण बौ. वाडी विहिरीवर संरक्षक जाळी बसविणे. | ४७८८६/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ४७८/- | २००/- |
| ६ | निळगुण नळपाणी पुरवठा दुरूस्ती करणे सन २०२५/२६ | १२४८८८/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १२४८/- | २००/- |
| ७ | निळगुण येथे सांडपाणी व्यवस्थापन करणे | १३८८००/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १३८८/- | २००/- |
| ८ | निळगुण नळपाणी पुरवठा योजना साठवण टाकी दुरूस्ती करणे | ७९५५०/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ७९५/- | २००/- |
| ९ | निळगुण बौ. वाडी विहीर दुरूस्ती करणे | ५००००/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५००/- | २००/- |
| १० | पाचोळे शाळा शौचालय दुरूस्ती करणे | २४१००/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | २४१/- | २००/- |
| ११ | निळगुण आ. वाडी मुख्य रस्त्यापासून वाडीकडे जाणारा रस्ता करणे | १२७६९६/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | १२७६/- | २००/- |
| १२ | पाचोळे सोमजाई मंदिराकडे जाणारा रस्ता करणे | ११३१८४/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ११३१/- | २००/- |
| १३ | रिळे स्मशानभूमी दुरूस्ती करणे | ८४८८८/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ८४८/- | २००/- |
| १४ | देगाव आ. वाडी स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता करणे | ११७९९०/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ११७९/- | २००/- |
| १५ | रिळे काळभैरव मंदिराजवळ महिला प्रसाधानगृह बांधणे | २००००/- | ३ महिने | १९/०३/२०२६ | स.१०.०० वा. पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | २००/- | २००/- |

अटी व शर्तीः-
१) प्राप्त निविदा दि. २०/०३/२०२६ रोजी स. ठीक १०.०० वाजता ग्रा.पं. देगाव येथे उपस्थितांच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येईल.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच देगाव यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं. चे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत देगाव**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत देगाव**
**ता. माणगाव, जि. रायगड**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटिस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे अलिबाग, ता. अलिबाग येथील खालील वर्णनाचा बिनशेती भूखंड व घर मिळकत, मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरवून तसा साठेकरार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**बिनशेती भूखंड व घर मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता.अलिबाग, स.नं. २५, २६, १००, १०१ पैकी भूखंड क्र. एल-३५, त्यास क्षेत्र ७२ चौ.मी., आकार रु.२८.७० तसेच सदर मिळकतीवर असलेले अलिबाग नगरपरिषद घर मिळकत क्र. ALB००००५१७७, (जुना मिळकत क्र.ALB००००२७४७) या मिळकतीवरील तळ मजला, त्यास क्षेत्र २४.५० चौ. मी., घरपट्टी रक्कम रु. १४३२/- तसेच पहिला मजला, त्यास क्षेत्र २५.३६ चौ.मी., घरपट्टी रक्कम रु. १४७६/- हा या नोटिसचा विषय आहे.

तरी वर वर्णन केलेली बिनशेती भूखंड व घर मिळकत विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाची, वहिवाटीची, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीं संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू जमिन व घर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.१२.०३.२०२६

**ॲड. मिलिंद चव्हाण**
८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे, चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती मिळकती, सदर मिळकतींचे विद्यमान मालक मोईज अब्बास भाईसाहेब फखरुद्दीन व हुसेन झाकीर कांचवाला यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकती या पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतींचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतींमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार | जमिन मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग जि. रायगड | ९३/१/ब/१/८<br>९३/१/ब/१/९<br>९३/१/ब/१/१० | २-६२-००<br>२-६२-००<br>२-६४-०० | २६.२०<br>२६.२०<br>२६.४० | हुसेन झाकीर कांचवाला<br>हुसेन झाकीर कांचवाला<br>मोईज अब्बास भाईसाहेब फखरुद्दीन |

अलिबाग,
दिनांक : ११/०३/२०२६

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
B.A. LL. B. (MAH/5773 /2006) Public Notary
Office : Ruturaj Plaza, Flat No. 1, Ground Floor, Shivaji Chowk, Near Gawade Optics, Alibag Raigad 402201.
contact No.: 09850042234/7741032234
E-mail ID: maheshmhatreoffice7@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील नमुद मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमच्या अशिलांनी मिळकतीचे विद्यमान मालक विनायक प्रमोटर्स तर्फे अतुल महादेव भगत यांच्याकडून कायम स्वरूपी करण्याची ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दंगदावा, लिज, पोटगी, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, तारण, ताबा/गहाण इत्यादी स्वरूपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकित खरेदीदार यांच्या वकिलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे. असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आर | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| वरसोली, ता. अलिबाग | १६६/१९०/१९६/१९७/ १९८/१६६ | एकूण ३-९०-०० | ३९.०० |

अलिबाग
दिनांक : ११/०३/२०२६

**ॲड. प्रियंका किशोर बिर्जे**
बी.कॉम.एलएल.बी.
जिल्हा न्यायालय अलिबाग
पत्ता : मु. पो. कुरूळ, ता. अलिबाग-रायगड
मो. नं. ८३७९९३७८७०

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक १) प्रशांत भालचंद्र राऊत २) अंजली अशोक आचरेकर ३) भारती भालचंद्र राऊत यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे आशिल यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी केलेली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालिलप्रमाणे

**-: मिळकतीचे वर्णन :-**

मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील १) भुमापन क्रमांक व उपविभाग १९५/१ क्षेत्र ०-३४-९० हे.आर., पो.ख. ०-००-५० हे. आर., एकुण क्षेत्र ०-००-५० हे.आर., आकार ३.८१ रु. पैसे. २) भुमापन क्रमांक व उपविभाग १७३/२ क्षेत्र ०-२२-०० हे.आर., पो.ख. ०-००-५० हे.आर., एकुण क्षेत्र ०-२२-५० हे.आर., आकार २.५६ रु. पैसे. या मिळकतीच्या खरेदी विक्री बाबत.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्या संबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

सही/-
**ॲड. तनुष्का पेडणेकर**
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ७०५७८८१६६६

ठिकाण: अलिबाग
दिनांक: ०९/०३/२०२६

## नोकरी विषयक जाहिरात

सावतामाळी नागरी सहकारी पतसंस्था मर्या.अलिबाग या संस्थेत शिपाई (SC,ST) या पदाकरिताच जागा भरावयाची आहे.

शैक्षणिक पात्रता :- १२ वी पास/पदवीधर (वाणिज्य शाखेला प्राधान्य), पतसंस्थेतील/ बॅंकेतील कामाचा ३ ते ५ वर्षाचा अनुभव आवश्यक, उमेदवार अलिबाग शहरापासुन ५ कि.मी च्या आत रहिवासी असणे आवश्यक.

तरी अनुभवी इच्छुकांनी सर्टिफिकेट व अनुभवाचा दाखल्यासह संस्थेच्या मुख्य कार्यालयात दि ३१/०३/२०२६ पर्यंत संपर्क साधावा. वेळ :- सकाळी १०.०० ते सायं ५.००

**सही/-**
**व्यवस्थापक**
**सावतामाळी नागरी सहकारी**
**पतसंस्था मर्या.अलिबाग**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर सुचना

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे आवास, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या जमिन मिळकती विद्यमान मालक श्रीमती सुप्रिया तन्मय जोगळेकर, राहणार आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नावे असलेली खुद्द सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहीवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिलांना कायमस्वरूपी विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| आवास, ता.अलिबाग | ४२२/२/२ | ०-७०-६०<br>०-०२-६० पो.ख.<br>०-७३-२० एकुण | ३-४७ |

वर नमूद भातशेती मिळकतीपैकी सुप्रिया तन्मय जोगळेकर हिच्या मालकी हक्कातील व ताबेकब्जा वहिवाटीतील क्षेत्र ०-२०-०० (हे. आर) मिळकत.

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा (१४) दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतींच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ११/०३/२०२६

सही/
**(ॲड. प्रमोद मधुकर पांडव)**
ऑफीस अे/२, हिराबाग सीएचएस
तळमजला, टिळक रोड, अलिबाग, ता. अलिबाग,
जि. रायगड ४०२ २०१.
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-टेकाळी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. २३१/१, क्षेत्र ०-२६-९० हे.आर., पो.ख. ०-०३-१० हे. आर., एकूण क्षेत्र ०-३०-०० हे. आर., आकार ३.५६ रू.पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुधाकर मोरेश्वर कवळे रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडुन आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ११/०३/२०२६

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,
ए विंग, रूम नं. ५, युनियन बॅंकेच्या समोर,
ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या मौजे नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड येथील बिनशेती मिळकती ह्या रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदर बिनशेती मिळकतींचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यास बिनशेती मिळकतींचे विद्यमान मालक यांनी अनुमती दिलेली आहे.

सदरहू बिनशेती मिळकतींचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | गांव | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| १) | नागोठणे | १३४/१ | ५२.६०.०० | ५२६.०० |
| २) | नागोठणे | १३४/२ | ४२.२०.०० | ४२२.०० |

वरील दोन्ही बिनशेती मिळकतींचे संपूर्ण क्षेत्र या जाहीर नोटीसचा विषय आहे.

वरील वर्णनाच्या बिनशेती मिळकती ह्या पूर्णतः निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरच्या बिनशेती मिळकतींचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरहू बिनशेती मिळकतींमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह अगर लेखी दाखल करण्यात याव्यात. अथवा रजिस्टर्ड पोस्टाने १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरच्या बिनशेती मिळकती ह्या निर्वेध व बोजाविरहीत आहेत असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल हे सदरच्या बिनशेती मिळकतीबाबत विद्यमान मालकांसोबत ठरविण्यात आलेला व्यवहार पूर्ण करतील. तसेच सदरच्या मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

रोहा-रायगड
दिनांक १२/०३/२०२६

अशिलांचे वकील
**ॲड. श्री. जयंत घ. वैरागी**
ऑफिस :-'वैरागी व्हिला',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, पेण, ता. पेण, जि. रायगड.
मो.नं. ९८८१६७१४२४

## निवडक



### कर्जत पंचायत समितीच्या सभापतीपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नमिता घारे

**नेरळ :** कर्जत पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती पदाच्या निवडणुकीत कर्जत परिवर्तन आघाडीचे दोन्ही उमेदवार बिनविरोध निवडून आले. सभापती पदावर राष्ट्रवादीच्या नमिता सुधाकर घारे तर उप सभापती पदी शिवसेना ठाकरे गटाच्या चित्रा जगदीश ठाकरे यांची बिनविरोध निवड झाली.कर्जत पंचायत समितीच्या नागरिकांचा म गास प्रवर्ग राखीव सभापती आणि उपसभापती पदाची निवडणूक कर्जत पंचायत समिती कार्यालयात झाली. पिठासीन अधिकारी तालुक्याचे तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्याकडे निर्धारित वेळेत नामांकन अर्ज दाखल झाले. सभापती पदासाठी बीड बुद्रुक पंचायत समिती गणाच्या सदस्या नमिता सुधाकर घारे यांनी तर उपसभापती पदासाठी मोठे वेणगाव गणातून विजयी झालेल्या चित्रा ठाकरे यांचे अर्ज प्राप्त झाले होते. दुपारी दोन वाजता विशेष सभा सुरू झाली. त्यावेळी दाखल झालेल्या दोन्ही अर्जांची छाननी करण्यात आली. त्यावेळी नमिता घारे यांचा सभापती पदाचा अर्ज वैध ठरला. उपसभापतीपदाचा चित्रा ठाकरे यांचा अर्ज छाननीमध्ये वैध ठरला. त्यानंतर पिठासीन अधिकारी डॉ धनंजय जाधव यांनी सभापती पदावर नमिता घारे यांची बिनविरोध निवड झाली असल्याचे तर उपसभापती पदावर चित्रा जगदीश ठाकरे यांची बिनविरोध झाली असल्याचे जाहीर केले.

### रोहा पंचायत समिती सभापतीपदी विजया पाशिलकर

**कोलाड :** रोहा पंचायत समितीच्या सभापतीपदी विजया विनोद पाशिलकर तर उपसभापतीपदी संजय संभाजी मांडलूसकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पंचायत समिती सभागृहात प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांच्या अध्यक्षतेखाली सभापती व उपसभापती निवड प्रक्रिया पार पडली.माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना रोहा तालुक्याच्या विकासासाठी सर्व सदस्यांनी एकजुटीने काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, कार्याध्यक्ष समीर शेडगे, रोहा-अष्टमी नगरपरिषद नगराध्यक्षा वनश्री शेडगे, सुरेश मगर, किसन मोरे, जगन्नाथ धनावडे, वर्षा हेमंत देशमुख, अरुणा जानू हंबीर, माजी सभापती बाबुराव बामणे, अनिल भगत, जयवंत मुंडे, अनंत देशमुख, राजेंद्र पोकळे, नरेश पाटील, रोहिदास पाशिलकर, मनिषा पाटील, नंदकुमार म्हात्रे, संतोष भोईर, राकेश शिंदे, अनिल भगत, शेणवई सरपंच प्रगती देशमुख यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, रोहा पंचायत समितीची निवडणूक ७ फेब्रुवारी रोजी पार पडली होती. निवडणुकीचा निकाल ९ फेब्रुवारी रोजी जाहीर झाला. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सहा जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळवले. पंचायत समिती गणांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ६, शिवसेनेचा १ आणि उबाठा गटाचा १ उमेदवार विजयी झाला आहे.



### म्हसळा पंचायत समिती प्रभारी सभापतीपदी राष्ट्रवादीचे बबन मनवे

**म्हसळा :** जिल्हाधिकारी रायगड यांच्या आदेशान्वये पंचायत समिती सभापती आणि उपसभापती पदाची निवड करण्यात आली. परंतू म्हसळा तालुका पंचायत समिती पद हे अनु. जाती (महिला) राखीव होते. अनु. जातीचे नियमानुसार आरक्षण न पडल्यामुळे सभापती पद रिक्त ठेवण्यात आले. त्यामुळे फक्त उपसभापती यांची निवड करण्यात आली. मात्र जिल्हाधिकारी रायगड यांच्या आदेशानुसार प्रभारी सभापती पदाचा कार्यभार उपसभापती बबन मनवे यांच्याकडे सोपविण्यात आला. या प्रसंगी पंचायत समिती सदस्य तथा गटनेते लहू अंबाजी म्हात्रे, पं. स. सदस्या समृद्धी चाचले, पं.स.सदस्य प्रियांका निंबरे, तालुका अध्यक्ष समीर बनकर, रेश्मा कानसे, महिला अध्यक्षा मीना टिंगरे, माजी अध्यक्षा सोनल घोले, श्रीपत मनवे, माजी उपसभापती मधुकर गायकर, माजी सभापती छाया म्हात्रे, महेश घोले, संतोष सावंत, किरण पालांडे, अनिल टिंगरे, माजी उपसभापती संदिप चाचले, प्रकाश म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

### तळा पंचायत समिती सभापतीपदी चंद्रकांत मुकण यांची निवड

**तळा:** तळा पंचायत समिती सभापतीपदी नथुराम मुकण तर उपसभापतीपदी रविंद्र मांडवकर यांची निवड जाहीर करण्यात आली. तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत तळा पंचायत समितीच्या चारही जागांवरती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार विजयी झाले होते. पंचायत समिती तळा येथे सभापती व उपसभापती पदासाठीची निवडणूक घेण्यात आली. या निवडणुकीत सभापतीपदी नथुराम मुकण व उपसभापतीपदी रविंद्र मांडवकर यांची बिनविरोध निवड



झाल्याचे जाहीर करण्यात आले. यावेळी मोठ्या प्रमाणात राष्ट्रवादीचे कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी सभापती नथुराम मुकण व उपसभापती रविंद्र मांडवकर यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले की, आम्ही खासदार सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे व माजी आमदार अनिकेत तटकरे यांचे मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्या सहकार्याने तळा तालुक्याचा विकास करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत. शासकीय योजनांचा नागरिकांना लाभ देण्याचा प्रयत्न असणार असल्याचे प्रतिपादनही त्यांनी यावेळी केले.

# स्मशानातील राखेत सोन्याचा शोध?

**पनवेलमध्ये गूढ प्रकार चर्चेत**

**| दीपक घरत |**

**| पनवेल |**

पालिका हद्दीतील काही स्मशानभूमींमधून राख चोरीला जात असल्याच्या तसेच स्मशान परिसरात अघोरी प्रकार होत असल्याच्या बातम्या दैनिक कृषीवलमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर परिसरात चर्चांना उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर या प्रकरणात एक वेगळी माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पालिका हद्दीतील काही स्मशानभूमींमध्ये अंत्यसंस्कारानंतर मोठ्या प्रमाणात राख पडून राहात असल्याने त्या राखेची विल्हेवाट कशी लावायची, हा प्रश्न तेथील कर्मचाऱ्यांसमोर निर्माण होत आहे. याचा फायदा घेत एक महिला आपल्या काही कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन स्मशानातील ही राख उचलून नेत असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, संबंधित महिला ही राख नेमकी कशासाठी वापरते किंवा ती कुठे नेली जाते, याबाबत स्मशानातील कर्मचाऱ्यांनाही कोणतीही ठोस माहिती नसल्याचे त्यांनी सांगितले. काही ठिकाणी अंत्यसंस्कारावेळी राहिलेल्या दागिन्यांचे सूक्ष्म अंश अथवा सोने मिळवण्यासाठी राख चाळली जात असल्याच्या चर्चाही होत असल्याने या प्रकाराबाबत नागरिकांमध्ये विविध तर्क-वितर्क व्यक्त केले जात आहेत.

या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, स्मशानातील राखेची अधिकृत विल्हेवाट लावण्याबाबत पालिकेकडून कोणती व्यवस्था





**अनेक प्रश्न अनुत्तरीत**

स्मशानातील राख उचलून नेणारी महिला नेमकी कोण?
ती राख कुठे आणि कशासाठी नेली जाते?
यासाठी कोणाची अधिकृत परवानगी आहे का?
स्मशानातील राखेची विल्हेवाट लावण्याची पालिकेची पद्धत काय?
या प्रकाराची चौकशी होणार का?

**पालिकेच्या भूमिकेकडे लक्ष**

स्मशानातील राखेची विल्हेवाट लावण्यासाठी पालिकेकडून अधिकृत पद्धत काय आहे आणि या प्रकाराला कोणाची परवानगी आहे का, याबाबत पनवेल महानगरपालिकेने स्पष्ट भूमिका मांडावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> **स्मशानभूमी हा अत्यंत संवेदनशील विषय असून, तेथील राख अशा प्रकारे उचलून नेली जात असल्याची माहिती समोर येणे चिंताजनक आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी.**
> **- संजय वाजत्री, स्थानिक नागरिक**

आहे का, तसेच ही राख नेण्यासाठी कोणाला अधिकृत परवानगी देण्यात आली आहे का, याबाबत स्पष्टता होणे आवश्यक असल्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. दरम्यान, काही दिवसांपूर्वी धुळे शहरातील देवपूर अमरधाम स्मशानभूमीतून राख चोरीला गेल्याची घटना समोर आली होती. चोरी केलेल्या राखेतून सोने मिळवण्यासाठी काही अज्ञात व्यक्तींनी हा प्रकार केल्याची माहिती समोर आली होती. त्यामुळे पनवेलमध्येही स्मशानातील राख उचलून नेली जात असल्याची माहिती समोर आल्यानंतर नागरिकांमध्ये संशय अधिक वाढला असून, या प्रकाराची सखोल चौकशी करण्याची मागणी होत आहे.

## जासईच्या उपसरपंचपदी काँग्रेसच्या सुलोचना घरत यांची बिनविरोध निवड

**उपसरपंच निवडीने काँग्रेस कार्यकर्त्यांचा सन्मान : घरत**



**| उरण | प्रतिनिधी |**

जासईच्या उपसरपंचपदी महाविकास आघाडीच्या सुलोचना पद्माकर घरत (काँग्रेस) यांची मंगळवारी (दि.१०) बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच संतोष घरत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सुलोचना घरत यांचा एकच अर्ज आल्याने बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जासई ग्रुप ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले, नवनिर्वाचित उपसरपंच सुलोचना घरत आणि त्यांचे पती दिवंगत पद्माकर घरत हे धडाडीचे कार्यकर्ते, परंतु दुर्दैवाने पद्माकर घरत या कार्यकर्त्याचे अकाली निधन झाले. सुलोचनाताईंनी पती आजारी असताना उत्तम साथ दिली, याची मला जाणीव आहे. त्यामुळे जेव्हा उपसरपंचपदी निवडणूक जाहीर होताच मी सुलोचनाताईंना उपसरपंचपदी बसवा, अशी विनंती केली. महाविकास आघाडीच्या सर्व सदस्यांनी, नेत्यांनी मनावर घेतले. त्यामुळे सुलोचना ताई उपसरपंचपदी विराजमान झाल्या. यामुळे मला माझ्या काँग्रेस कार्यकर्त्याचा सार्थ अभिमान आहे. शेकाप आणि महाविकास आघाडीच्या सर्वच कार्यकर्त्यांच्या, पदाधिकारी यांच्या मेहनतीने आणि उत्तम सहकार्याने उरणमध्ये आज आपली ताकद दाखवून दिली आहे. लढाऊ महिला निवडून आल्या.

काँग्रेसमध्ये सर्वांना सन्मान आहे. आपण सर्व कार्यकर्ते आहोत. मी आपल्यासोबत खंबीरपणे उभा आहे. यावेळी पतीच्या आठवणीने उपसरपंच सुलोचना घरत भाऊक झाल्या होत्या. महेंद्र घरत यांनी त्यांचे अभिनंदन केले.यावेळी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, पंचायत समिती सदस्य निर्मला घरत, नरेश घरत, काँग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, संजय ठाकूर, आदित्य घरत आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांनीही उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर सुलोचना घरत यांचे अभिनंदन केले.

## श्री झोलाई देवी सीसीटीव्ही यंत्रणेसाठी सुरेंद्र चव्हाणकडून ५१ हजाराची देणगी

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड तालुक्यातील ऐतिहासिक देवस्थान असलेल्या श्री झोलाई देवी मंदिरासाठी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यासाठी महाड मधील समृद्धी हॉटेल मालक सुरेंद्र चव्हाण यांनी ५१ हजार रुपयांची देणगी श्री झोलाई देवीचरणी अर्पण केली



महाड तालुक्यातील विन्हेरे गावची ऐतिहासिक देवस्थान असलेल्या व ८४ गावची मालकीण असलेल्या श्री झोलाई देवी मंदिराच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून आवश्यक असणारी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यासाठी महाड मधील समृद्धी हॉटेलचे मालक सुरेंद्र चव्हाण यांनी श्री झोलाई देवीच्या छबिना उत्सवामध्ये ५१ हजार रुपयाची देणगी सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यासाठी दिल्याबद्दल श्री झोलाई देवी ट्रस्टचे अध्यक्ष महेश दगडू महाडिक व विश्वस्त माजी सभापती सिताराम कदम यांनी देणगीदार सुरेंद्र चव्हाण यांचे झोलाई देवी संस्थान तर्फे आभार मानले.

## माथेरान नगरपरिषदेचे उत्पन्नवाढीसाठी विरोधी प्रस्ताव

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरान नगरपालिका सध्या विविध कारणांमुळे चर्चेत असताना नगरपालिकेची आर्थिक स्थिती डबघाईला आली आहे. पालिकेची सुधारण्यासाठी काही ठोस उपाययोजना राबविण्याची मागणी शिवसेना ठाकरे गटाचे नगरसेवक सचिन दाभेकर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी माथेरान नगरपालिकेचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांना निवेदन दिले आहे.

नगरसेवक दाभेकर यांनी सूचना केलेले विषय यात छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात आकाश पाळणा आणि गेम झोन उभारण्यात यावे. माथेरान नगरपरिषदेच्या छत्रपती



शिवाजी महाराज उद्यानामध्ये पूर्वीप्रमाणे पर्यटकांसाठी आकाश पाळणा व विविध मनोरंजनात्मक गेम झोन पुन्हा सुरू करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी. दस्तुरी नाक्यावर चालकांसाठी सशुल्क सुविधा उपलब्ध करून द्यावी. दस्तुरी नाका येथील नगरपालिकेच्या कार्यालयाच्या टेरेसवरील मोकळ्या जागेत पर्यटकांसोबत येणाऱ्या चालकांसाठी सशुल्क बंकर बेडची सुविधा आणि आंघोळीकरिता पत्र्याचे शेड तसेच कॉमन रूम उभारण्यासाठी निविदा काढण्यात यावी. लेक आणि पिसरनाथ मंदिर परिसरात गेम झोन उभारण्यात यावे. श्री पिसरनाथ मंदिर परिसरातील संतोष कदम यांच्या दुकानाच्या मागील बाजूस पर्यटकांच्या मनोरंजनासाठी स्वतंत्र गेम झोन उभारण्यासाठी निविदा राबवावी. बंद पडलेले आणि पर्यटकांची मागणी असलेले आकाशगंगा प्रकल्प सुरू करण्याते यावे. दरम्यानवरील सर्व प्रकल्प राबविल्यास नगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक परिस्थिती सुधारेल. त्याचबरोबर पर्यटकांना अधिक सुविधा मिळाल्यामुळे माथेरानमधील पर्यटनाला देखील चालना मिळेल असा विश्वास दाभेकर यांनी व्यक्त केला आहे.

## करिअर मार्गदर्शन व्याख्यान

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

वीर वाजेकर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने करिअर गायडन्स विषयक विशेष मार्गदर्शन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सहायक प्राध्यापक सुनंदा चक्रबोर्ती यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. चक्रबोर्ती यांनी संस्थेची उद्दिष्टे, विशेष मुलांसाठी राबविले जाणारे शैक्षणिक उपक्रम तसेच सुविधाद्वारे चालविल्या जाणाऱ्या पूर्णवेळ व अर्धवेळ कोर्सेसची माहिती सविस्तर दिली. कार्यक्रमात महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी तृप्ती म्हात्रे कडू यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## नेरळ महागायक स्पर्धा उत्साहात

**| तळा | प्रतिनिधी |**

नेरळचा महागायक स्पर्धेचे आयोजन नेरळ येथील आरजेएस म्युझिकल ग्रुप यांच्या माध्यमातून केले होते. कराओके गायक यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी नेरळ येथील आरजेएस म्युझिकल ग्रुप यांच्या वतीने नेरळचा महागायक स्पर्धेचे आयोजन केले होते.

नेरळमधील आरजेएस ग्रुपचे रविंद्र वझरकर, जितेंद्र साळुंखे, सचिन धामणस्कर यांच्या ग्रुपकडून या स्पर्धेचे आयोजन केले होते.या स्पर्धेचे उद्घाटन प्रसंगी भगवान चंचे, रितेश भालेराव, संतोष शिंगाडे, संदीप उतेकर, संदेश लाड, नरेंद कराळे आणि गजानन साळुंखे, रुपेश चव्हाण आदी उपस्थित होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रसिद्ध गायक भावेश खाडे तसेच अक्षय जोशी यांनी काम पाहिले तर स्पर्धेचे सूत्र संचालन सुदेश महागावकर यांनी केले. दिवसभर चाललेल्या स्पर्धेत नेरळचा महागायकसाठी स्पर्धा रंगली. त्यातून परीक्षकांनी दर्जेदार गाणी यांची निवड केली आणि नेरळचा महागायक यांची निवड करण्यात आली.परीक्षकांनी बदलापूर येथील सोची मॅथ्यू यांनी नेरळचा महागायक होण्याचा मान मिळवला.दुसरा क्रमांक ठाणे येथील मेहेक शेख, तिसरा क्रमांक मुंबई येथील श्रीनंदन घारपुरे, चतुर्थ क्रमांक नवी मुंबई येथील तेजसिंह परिहार आणि पाचवा क्रमांक पालघर गुरू हरण यांनी पटकावला.

## अनुभव नसलेले अधिकारी गठीत समितीत

**कृषी विभाग सेवानिवृत्त लक्ष्मण देशमुख यांचा आरोप**

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

सेवानिवृत्त होऊन अनेक वर्ष उलटून गेली. मात्र लक्ष्मण देशमुख यांना अद्यापपर्यंत मुळ वेतन दिले नाही. सेवानिवृत्त मिळणारी पेन्शन कमी दराने दिली जात आहे. याबाबत कृषी आयुक्तांकडे केलेल्या तक्रारीनंतर समिती गठीत केली. परंतू गठीत केलेल्या समितीमधील काही सदस्यांना वित्तलेखासह रेकॉर्ड तपासणीचा कोणताही अनुभव नसल्याचा आरोप देशमुख यांनी केला आहे.

लक्ष्मण देशमुख हे सेवानिवृत्त अधिकारी आहेत. गेली ३२ वर्षे त्यांनी कृषी विभागात सेवा केली. प्रदिर्घ सेवेनंतर ३१ मे २०१३ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. मात्र त्यांना अद्यापपर्यंत मुळ वेतन दिले नाही. सेवानिवृत्त मिळणारी पेन्शन कमी दराने दिली जात आहे. या विरोधात त्यांनी आवाज उठविला. त्यांनी कृषी आयुक्तांकडे लेखी तक्रार केली. अंमलबजावणी करण्याचे आदेश आयुक्तांनी दिले. कृषी आयुक्तांनी आदेश देऊनही तक्रारीची दखल कृषी सहसंचालक शिवाजी आमले यांनी घेत ली नसल्याचा आरोप देशमुख यांनी केला आहे. आमले यांनी या प्रकरणी सदस्य समिती गठीत केली. या समितीमध्ये अध्यक्षासह पाच जणांची निवड करण्यात आली आहे. या समितीमध्ये नियमांची पायमल्ली करीत काही सदस्यांची नेमणूक केल्याचा आरोप त्यांच्याकडून करण्यात आला आहे. वित्त व लेखा, रेकॉर्ड तपासणीचा कोणताही अनुभव नसलेले कृषी सहाय्यक तसेच बाह्यस्त्रोताचे काम करणारे दिनेश कोळी, तालुका कृषी अधिकारी सुनील निंबाळकर, कृषी कार्यालयातील कर्मचारी आण्णासाहेब देवकर यांची या समितीमध्ये नियुक्ती केली आहे. ज्यांना या कामाचा कोणताही अनुभव नाही, त्या अधिकारी यांच्याकडे काम सोपविल्याने गैरमार्ग होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वेतनाच्या रेकॉर्डबाबत काही गैरप्रकार घडल्यास अध्यक्षांसह सभासदांना जबाबदार धरले जाईल असा आरोप देशमुखांनी केला आहे.

**उत्तरांची पडताळणी करणे शक्य होणार | ऑनलाइन आक्षेप नोंदवता येणार**

# पाचवी, आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेची उत्तरसूची जाहीर

**| रायगड | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने फेब्रुवारी महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी आणि आठवी शिष्यवृत्ती परीक्षेची तात्पुरती उत्तरसूची प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार आता परीक्षार्थी, पालक आणि शिक्षकांना या उत्तरसूचीवर काही आक्षेप असल्यास ११ ते १७ मार्च या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने आक्षेप नोंदवता येणार आहेत.

राज्य परीक्षा परिषदेतर्फे शिष्यवृत्ती परीक्षा २२ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यभरात आयोजित करण्यात आली होती. यंदा पाचवीच्या ९६.६१ टक्के विद्यार्थ्यांनी



परीक्षा दिली. परीक्षेसाठी ६ लाख ५७ हजार १७० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ६ लाख ३४ हजार ९२० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. तर आठवीच्या ९६.४७ टक्के विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या ३ लाख ८७ हजार ६२३ विद्यार्थ्यांपैकी ३ लाख ७३ हजार ९३१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. आता या परीक्षेची इयत्तानिहाय आणि पेपरनिहाय उत्तरसूची परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उत्तरसूचीवरील आक्षेपांसाठी पालकांना संकेतस्थळावर, तर शाळांना त्यांच्या लॉगीनमध्ये ही लिंक उपलब्ध आहे. ईमेल किंवा प्रत्यक्ष स्वरूपात येणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

केवळ ऑनलाइन अर्जांचीच दखल घेतली जाणार आहे. प्राप्त आक्षेपांवर विषय तज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन त्यानंतर अंतिम उत्तरसूची प्रसिद्ध केली जाईल. उत्तरसूचीसोबतच विद्यार्थ्यांच्या अर्जातील दुरुस्तीसाठीही ११ ते १७ मार्च दरम्यान मुदत देण्यात आली आहे. यंदा शिष्यवृत्ती परीक्षेतील प्रामुख्याने पाचवीच्या मराठी आणि गणित या विषयांच्या प्रश्नपत्रिकेच्या काठिण्यपातळीवरून प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. त्यामुळे परीक्षा झाल्यानंतर शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांचे लक्ष अंतरिम उत्तरसूची कधी जाहीर केली जाते, याकडे लागले होते. आता राज्य परीक्षा परिषदेने उत्तरसूची जाहीर केल्याने कार्बन उत्तरपत्रिकेच्या आधारे विद्यार्थ्यांच्या उत्तरांची पडताळणी करणे शक्य होणार आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)